नवी मुंबई महानगरपालिका

Navi Mumbai Municipal Corporation

पहिला माळा, बेलापूर भवन, सी.बी.डी.
नवी मुंबई ४०० ६१४
दूरध्वनी क्र : २७५७ १७ ३३, २७५७ १७ २८
२७५७ २३७४ (थेट)
फॅक्स : २७५७ २३ ७४

1ST FLOOR, BELAPUR BHAWAN, CBD,
NAVI MUMBAI – 400 614
TEL. No. : 2757 17 33, 2757 17 28
2757 2374 (Direct)
FAX : 2757 23 74


**नवी मुंबई महानगरपालिका**

**परवाना विभाग**

**मुख्य कार्यालय :- बेलापूर भवन, १ ला मजला, सेक्टर-११, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**

# जाहीर सूचना

नवी मुंबई महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४, २४५ तरतुदी तसेच महाराष्ट्र शासनाकडील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहीरात व फलक नियंत्रण) नियम २००३ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५८ च्या पोटकलम ४८ आणि ४५९ मधील तरतुदीनुसार **"नवी मुंबई महानगरपालिका जाहीरात व आकाशचिन्ह उपविधी - २०११"** प्रारुप उपविधी महापालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक -८०२ दिनांक ०४/०७/२०११ अन्वये मंजूर केलेले आहेत.

उक्त प्रारुप उपविधी **दिनांक २२/०७/२०११** पासून **परवाना विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, २ रा मजला, कै.गौरव म्हात्रे कला केंद्र, सेक्टर-३अे, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४** येथे नागरिकांच्या माहितीसाठी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) उपलब्ध ठेवलेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४६० मधील तरतुदीनुसार या सूचनेव्दारे सदर प्रारुप उपविधींबाबत नागरिकांकडून लेखी स्वरुपात हरकती व सूचना मागविणेत येत आहेत. तरी, महाराष्ट्र शासन राजपत्रात ही नोटीस प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून एक महिन्यापेक्षा अधिक नसेल अशा मुदतीत, कोणत्याही लेखी हरकती व सूचना **परवाना विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, २ रा मजला, कै.गौरव म्हात्रे कला केंद्र, सेक्टर-३अे, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४** येथे पाठविण्यात याव्यात. त्यानंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**स्वाक्षरीत/-**
**(भास्कर वानखेडे)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**ठिकाण : सी.बी.डी., बेलापूर**
**दिनांक :२१/०७/२०११**

# नवी मुंबई महानगरपालिका

## परवाना विभाग

## प्रस्तावित

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील
कलम २४४ व २४५ तरतुदी,
(जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ अन्वये
**" नवी मुंबई महानगरपालिका जाहिरात व आकाशचिन्ह उपविधी - २०११"**

**(प्रारुप)**

दिनांक ०४/०७/२०११ रोजीच्या मासिक सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक- ८०२ अन्वये मंजूर प्रारुप उपविधीची प्रत

## भाग - ०१

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २४४,२४५ व ३९२ च्या तरतुदींच्या अनुपालनासाठी कलम ४५८ च्या पोटकलम (४८) च्या तरतुदींनुसार करण्यात आलेले उपविधी**

## उपविधी

**(I) संक्षिप्त नामाभिधान -**

**(अ) हे उपविधी "नवी मुंबई महानगरपालिका जाहिरात व आकाशचिन्ह उपविधी-२०११" या नावाने संबोधण्यात येतील.**

**(ब) हे उपविधी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लागू होतील.**

**(क) हे उपविधी राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.**

**(II) उपविधींची निकड :**

विविध जाहिरात माध्यमांचा वाढता प्रभाव व परिणामी जाहिरात प्रसिध्द करणेसाठी असलेली चढाओढ/स्पर्धा यामुळे शहरामध्ये अनेक ठिकाणी जाहिराती प्रदर्शित होऊन खालील विपरीत परिणाम दिसून आलेले आहेत.

१. अयोग्य ठिकाणी अयोग्य आकाराचे होर्डींग्ज उभारल्याने नागरीकांच्या नैसर्गिक मोकळी हवा व प्रकाश मिळण्यास अडथळा निर्माण झालेबाबतच्या नागरीकांच्या तक्रारी दाखल होत आहेत.

२. जाहिरातदार व गृहनिर्माण संस्थांचे सदस्य यांचेमध्ये कलह वाढत आहे.

३. गृहनिर्माण संस्थेची नोंदणी होण्यापुर्वी काही ठिकाणी बांधकाम व्यावसायिकांनी जाहिरात संस्थांस जाहिरात लावण्यास "ना हरकत प्रमाणपत्र" दिलेले आहे. गृहनिर्माण संस्थेची नोंद झालेनंतर तेथील रहिवाश्यांनी या जाहिरातींबाबत तक्रारी केलेल्या आहेत.

४. ज्या इमारती महामार्गाला लागून आहेत. अशा इमारती/व्यापारी संकुलावर प्रमाणापेक्षा जास्त जाहिरातदार होर्डींग्ज उभारणेकरीता परवानगी मागतात.

५. जाहिरात संस्थांनी संस्थेने एकाच रस्त्यावर वेगवेगळया आकाराचे होर्डींग्ज तयार करुन शहराच्या सौंदर्यीकरणास बाधा निर्माण केलेली आहे.

६. अस्तित्वात असलेल्या होर्डींग्जच्या शेजारी दुसरी जाहिरात संस्था परवानगी मागते.

७. महापालिका क्षेत्रात असलेली अन्य प्राधिकरणे उदा. रेल्वे, सिडको, एम.आय.डी.सी., एम.एस.आर.डी.सी. इत्यादी हे त्यांचे मालमत्तांवर होर्डींग्ज उभारणेकरीता मोठया प्रमाणावर परस्पर परवानगी देतात. यामुळे महापालिकेस नियंत्रण ठेवणे कठीण जाते.

८. महापालिका क्षेत्रातील विविध चौकांवर वाहतुक कोंडी होऊन सदर जाहिरातींमुळे वाहनचालकांस रात्रीच्या वेळी प्रदर्शित जाहिरातीचा त्रास होत आहे.

९. जाहिराती स्पष्टपणे दिसण्याकरिता चोरुन झाडे कापणे / काटछाट करणे हयामुळे पर्यावरणाचा -हास होतो.

१०. सध्या उभारलेल्या बांधकाम चौकटीवरील जाहिरात फलकामुळे शहराच्या सौंदर्यात कोणतीही भर पडत नाही. उलटपक्षी, अनेक ठिकाणची आकाश रेखा ओंगळवाणी दिसते. हया संदर्भात नियमन करणे आवश्यक आहे.

११. महापालिकेचे निश्चित धोरण व कार्यप्रणाली नसल्याने जाहिरातीमधून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही.

वरील सर्व प्रकारच्या नागरी समस्या व तक्रारींची दखल घेता महापालिकेची स्वत:ची सर्वसमावेशक जाहिरात व आकाशचिन्ह उपविधी असणे आवश्यक झाले आहे.

## (III) व्याख्या :-

**(अ) विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास या नियमात -**

(१) **जाहिरात** म्हणजे व्यवसाय किंवा इतर कामकाजाशी संबंधित कोणतेही साधन किंवा उद्‌घोषणा किंवा शब्द, अक्षर, नमुना (मॉडेल) भित्तीपत्रके, जाहिरात फलक ,बॅनर्स, तात्पुरत्या कमानी, प्रकाशित चिन्हे, नामफलक, दिशादर्शक फलक, फुगे, कापड, काच इत्यादी हयांमधील कोणत्याही प्रकारच्या साधनांवर जाहिरात प्रदर्शित करणे.

(२) **अभिकरण** म्हणजे वैयक्तिक अर्जदार, नोंदणीकृत धर्मादाय संस्था, विधी संस्थापित नसलेली कंपनी / भागीदार किंवा कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत समाविष्ट असलेली कंपनी.

(३) **कापडी फलक** म्हणजे सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी, काही जाहिराती किंवा उद्‌घोषणा किंवा लिखित मजकूर हयांचा समावेश असलेले कापड किंवा कापडसदृष्य माध्यम.

(४) **इमारतीवरील जाहिरात** म्हणजे कोणत्याही इमारतीच्या दर्शनी भागावरील किंवा बांधकाम किंवा दुरुस्ती चालू असलेल्या इमारतीच्या परांचीवरील किंवा काचेच्या तावदानावर किंवा खिडक्यांवर बसविलेल्या किंवा चिकटविलेल्या जाहिराती.

(५) **जाहिरात फलक उभारण्यासाठी खांबांचा वापर न करता इमारतीवर केलेली निऑन युक्त जाहिराती** म्हणजे जे बांधकाम पुरातन नाही, ज्यावर निऑन बल्बचा वापर केला आहे, तसेच जे दिवे रात्री पेटवले जातात आणि जे एकाच वेळी एक किंवा अनेक वेगवेगळ्या रंगामध्ये प्रदर्शित होतात अशा इमारतीच्या दर्शनी भागातील जाहिरात.

(६) **बस आश्रयस्थानांवरील जाहिरात** म्हणजे बस आश्रयस्थानांवरील प्रदर्शित केलेली अनुवादित किंवा तत्सम प्रकारची जाहिरात.

३/-

(७) **आयुक्त** म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार नियुक्त केलेले नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त

(८) **सक्षम प्राधिकारी म्हणजे** आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही नवी मुंबई महानगरपालिकेचा अधिकारी ज्यामध्ये अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त, सहा.आयुक्त, विभाग अधिकारी, इत्यांदीचा समावेश असेल.

(९) **महानगरपालिका म्हणजे** नवी मुंबई महानगरपालिका

(१०) **दिशादर्शक फलक** म्हणजे खाजगी आणि व्यावसायिक आस्थापनांनी त्यांची कार्यालये किंवा व्यावसायिक स्थाने दर्शविण्यासाठी उभारलेले फलक.

(११) **इलेक्ट्रॉनिक जाहिरात फलक** म्हणजे एखाद्या बांधकामावर कायमस्वरुपी उभारलेले विदयुत शक्तीव्दारे चालविले जाणारे जाहिरात फलक, इलेक्ट्रॉनिक किंवा निऑन दिवे, एलईडी किंवा एलसीडी कार्यपध्दती इ.विद्युतीय साधनांव्दारा केलेली जाहिरात.

(१२) **कमानीवरील जाहिरात** म्हणजे रस्त्यालगत उभारलेल्या खांबावरील आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूस धातूच्या खांबावरील खांबाला जोडलेले बीमच्या आकाराचे वाहतुकीच्या दिशेच्या विरुध्द बाजूस बसविलेली जाहिरात.

(१३) **ग्लोसाईन बॉक्स** जाहिरात म्हणजे प्लास्टिकपासून तयार केलेल्या पारदर्शक किंवा प्रकाशभेदी असलेल्या धातूच्या पेटीवर बसविलेली आणि मागच्या बाजूने विद्युत दिव्यांव्दारे प्रकाशित केलेली जाहिरात.

(१४) **जाहिरात फलक** म्हणजे जाहिरातीच्या उद्दिष्टाकरिता किंवा कोणत्याही ठिकाणी जनतेला आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून माहिती देण्यासाठी , व्यक्ती, सार्वजनिक कामगिरी , विक्रीचा माल इत्यादीची माहिती देण्यासाठी चित्र ,शब्द किंवा माहितीसह जमिनीवरील बांधकामाचा कोणताही पृष्ठभाग किंवा इमारतीच्या छताचा कोणताही भाग किंवा छज्जावरील भाग हयावर उभारलेली जाहिरात फलक त्यामध्ये पारदर्शक स्वरुपाच्या एक किंवा अधिक रंगाचा वापर केलेल्या निऑन बल्ब/दिवे/ लाईटस् इत्यादींचा वापर केलेल्या जाहिरातींचाही समावेश होतो.

(१५) **फिरते जाहिरात फलक** म्हणजे जी जाहिरात उत्तम प्रदर्शनासाठी महत्वाच्या जागी उभी करता येईल किंवा चालविता येईल, असा वाहनावर किंवा वाहनामागे पॅनेलवर लावता येईल असा एकेरी अथवा दुहेरी बाजूचा जाहिरात फलक.

(१६) **भित्तीपत्रक** म्हणजे कागदाचा तुकडा किंवा इतर कोणतीही वस्तू जी जाहिरातीसाठी अथवा सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी वापरली जाते.

४/-

(१७) **निशान/झेंडा** म्हणजे कागदाचा अथवा लाकडी काठीमध्ये रोवलेला लोगो/विविध रंग असलेले लहान कापडी निशान

(१८) **चक्रांकित जाहिरात प्रदर्शित करणे** म्हणजे रोलरव्दारे गुंडाळी होत प्रदर्शित होणारी पेटीवजा नक्षीदार जाहिरात ही प्रकाशित असेल किंवा अप्रकाशित किंवा बॅकलिट पध्दतीची असेल.

(१९) **आकाश चिन्ह** म्हणजे कोणत्याही स्तंभ, खांब, सर्वसाधारण चौकट किंवा इतर आधारावर संपूर्णत: किंवा अंशत:, कोणत्याही जमिनीवर, इमारतीवर किंवा बांधकामावर आधारित किंवा जोडलेले आहे असे शब्द, अक्षर नमूना, साधन किंवा जाहिरातीचे प्रतिनिधीत्व करणारे दृश्य ,उदघोषणा किंवा रस्त्याच्या काही अंतरावरुन आकाशापलिकडे दिसेल असे उंचावरील चिन्ह किंवा असा स्तंभ , खांब किंवा सर्वसाधारण चौकट किंवा इतर आधार हयांचा सर्व भागाचा समावेश आहे. आकाश चिन्ह हयामध्ये फुगे , पॅराशुट किंवा जाहिरातीकरिता संपूर्णत: किंवा अशंत: वापरण्यात येणारे अशाप्रकारचे साधन, उदघोषणा किंवा जमीन किंवा इमारत किंवा बांधकाम किंवा कोणत्याही मार्गावरील दिशा दर्शकांचा समावेश होतो. **परंतु खालील बाबींचा समावेश होत नाही :-**

(१) ज्याचा कोणत्याही जाहिरातीत,उदघोषणेत किंवा दिशादर्शकात कोणतेही निशाणाचा खांब (ध्वज) , खांब किंवा वातकुक्कुट / संपूर्णत: किंवा अशंत: अंगिकारल्यास किंवा वापरल्या खेरीज.

(२) कोणतेही चिन्ह किंवा फलक, चौकट किंवा योजनाबध्दतेने टांगलेली किंवा भिंतीच्या किंवा कोणत्याही इमारतीच्या सज्जावरील किंवा भिंतीच्या ब्लॉकिंग भागावरील किंवा छताच्या उंचवटयावरील वस्तू.

तथापि, सदर फलक, चौकट किंवा इतर योजनाबध्दतेने टांगलेली वस्तू हे एकसंघ असावेत, खुले असू नयेत. भिंतीच्या कोणत्याही भागाच्या किंवा छताच्या उंचवटयाच्या किंवा ज्यावर ते बसविले आहेत किंवा आधारलेले आहेत त्याच्या तीन फूट उंचीपेक्षा उंच असू नयेत.

(३) संपूर्णत: रेल्वेच्या कामकाजाशी निगडीत कोणताही शब्द,अक्षर, नमूना, चिन्ह किंवा उपरोक्तप्रमाणे दर्शविलेले आणि रेल्वे, रेल्वे स्टेशन, यार्ड, प्लॅटफॉर्म व स्टेशन आणि रेल्वे कार्यालयाशी जाणारा मार्ग आणि जे रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागी वसलेले नाही ते.

(४) ज्यावर सदर जागा किंवा इमारत विकावयाची आहे, भाडयाने द्यावयाची आहे अशी नोटीस चिकटविलेली आहे ती जागा किंवा इमारत.

(२०) **तात्पुरत्या कमानी** म्हणजे मान्यवरांच्या स्वागतासाठी किंवा जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी रस्त्यावर लाकडी/लोखंडी पाईप इत्यादीप्रकारच्या खांबांच्या सहाय्याने उभारण्यात येणारी तात्पुरता सांगाडा.

५/-

(२१) **तात्पुरती (मोठया संख्येत) जाहिरात** म्हणजेच एखाद्या उत्सवाच्या किंवा समारंभाच्या मर्यादीत कालावधीकरीता फ्लेक्स/बॅनर्स/होर्डींगद्वारे मर्यादित भागात केलेली जाहिरात. मोठया प्रमाणावरील व्यावसायिक फलकांमध्ये सर्व्हीस व्हॅन /किंवा मालाचे वितरण करणारी वाहने यासारख्या फिरत्या माध्यमांव्दारे केली जाणारी जाहीरात

(२२) **त्रिमिती जाहिरात -(Tri-Vision Advertisement)** म्हणजे यामध्ये एकामागोमाग एक अशा पध्दतीने फिरणारे त्रिकोणी पॅनेल यामध्ये त्रिकोणी भागाचे तीन दर्शनी भाग एकामागोमाग एक असे दिसतात व त्याव्दारे तीन वेगवेगळे जाहिरातींचे संदेश प्रदर्शित होतात. सदर जाहिरात फलक प्रकाशित किंवा अप्रकाशित असू शकतील.

(२३) **युनिॲडपोल** म्हणजेच सिमेंट कॉक्रीटचे फाउंडेशनसह एका स्टीलखांबावर रस्त्याचा वाहनमार्गाच्या बाजुस जमिनीवर उभारलेल्या युनिपोलवरील जाहिरात फलक.

(२४) **मिनी ॲडपोल** म्हणजेच रस्ता दुभाजकामधील ज्या ठिकाणी विदयुत खांब नाहीत त्या ठिकाणी एकखांबी उभारलेला लहान आकाराचा जाहिरात फलक.

(२५) **भिंतीवरील रंगविलेल्या जाहिराती** - म्हणजेच थेट इमारतीच्या भिंतीवर किंवा कोणत्याही बांधकामावर किंवा स्थापत्य बांधकामावर रंगकामाव्दारे प्रदर्शित केलेली जाहिरात.

(२६) **किऑस्क (दिव्याचे खांबावरील)-** म्हणजेच महापालिकेच्या विदयुत खांबांवर फ्रेममध्ये लावलेली जाहिरात.

**(२७) पादचारी पुल (फुट ओव्हर ब्रिज )** - म्हणजेच पादचा-यांना रस्ता ओलांडणेकरीता बांधलेला पाय-यांचा/स्वयंचलित उद्वहन असलेला पुल.

(२८) **स्कायवॉक -** म्हणजेच पादचा-यांना जा-ये करणेसाठी रस्त्याच्यावर समांतर बांधलेला पादचारी पूल

(२९) **विहीत अर्जाचा नमूना** ज्याव्दारे दुकानावर जाहीरात नामफलक/न्युऑन नामफलक इत्यादी लावण्यासाठी आणि प्रदर्शित करण्याच्या परवानगीसाठी किंवा विद्यमान परवानगीचे नूतनीकरण करण्यासाठी महापालिकेकडे करावयाच्या आयुक्तांनी **परिशिष्ट - अ** येथे विहित केलेला नमूना.

(३०) **जाहीरात परवाना** जाहीरात प्रसिध्दीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आलेला विहीत नमुन्यातील परवाना.

(३१) **परवाना शुल्क** जाहीरात प्रसिध्दीसाठी विहीत करण्यात आलेले परवाना शुल्क.

(ब) या नियमात वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा किंवा वाक्यसमुहांच्या स्वतंत्र व्याख्या देण्यात आलेल्या नाहीत, ते मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ या अधिनियमात ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तोच त्यांचा अर्थ गृहीत धरण्यात येईल.

*भाग - ०२*

## १. <u>जाहिरातीचे प्रकार</u> :-

महानगरपालिका क्षेत्रात लावण्यात येणा-या विविध जाहिरातींचे खालील सहा प्रकारात वर्गीकरण करण्यात येत आहे.

### I. कायमस्वरुपी जाहिरात -

१ होर्डींग्ज ( ग्लोसाईन / निऑनसाईन)
२ कमानी (गॅन्ट्री)
३ युनिअॅडपोल
४ अॅडपोल
५ ट्रायव्हिजन युनिपोल
६ किऑस्क (दिव्याचे खांबावरील)
७ पादचारी पुल (फुट ओव्हर ब्रिज )
८ बस स्टॉपलगत मिनी अॅडपोल
९ दिशा दर्शक फलक
१० स्कायवॉकवरील जाहीरात

### II. तात्पुरती जाहिरात

### III. वाहनाव्दारे / वाहनावरील जाहिरात

### IV. दुकान, कार्यालय, अन्य वाणिज्य, औद्योगिक व इतर आस्थापना व्यवस्थापनावरील जाहिराती.

### V. शहर सौदर्यीकरणा अंतर्गत जाहिरात

१ पोलिस किऑक्स
२ फोन किऑक्स
३ कॉबलर किऑक्स
४ फ्लॉवर पॉट किऑक्स
५ पार्कींग पोल
६ रस्ता दुभाजकावरील जाहिरात
७ स्ट्रीट फर्निचर जाहिरात
८ वाहतुक सिग्नलवरील संदेश फलक
९ निशान/झेंडा लावणेसाठीचे कायमस्वरुपी स्टॅंड
१० अंडरपासमधील जाहीराती इत्यादी

VI. वर नमूद केलेल्या अ.क्र. १ ते ५ व्यतिरिक्त अन्य जाहिराती व वेळोवेळी नव्याने विकसित होणा-या जाहीरात माध्यमांचे त्या - त्या प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यात येईल

## I. कायमस्वरुपी जाहिरात -

कायमस्वरुपी जाहिरात म्हणजे ज्या जाहिराती कायमस्वरुपी संरचना तयार करुन त्यावर प्रदर्शित करण्यात येतील अशा जाहिरातींना कायमस्वरुपी जाहिरात असे संबोधण्यात येईल.

### अे) होर्डींग -( ग्लोसाईन / निऑनसाईन) :

१. उभारण्यात येणा-या होर्डींग/कमानी जाहिरातीची संरचना ही सौंदर्यशास्त्रानुसार (aesthetically design) मान्यताप्राप्त संरचना अभियंता यांनी प्रमाणित केलेल्या संरचनेप्रमाणे असेल.

२. होर्डींग/कमानीच्या संरचना मजबुतीबाबत संरचना अभियंत्यामार्फत तपासणी करुन घेऊन संरचना अभियंत्याचे प्रमाणपत्र घेण्यात येईल.

३. इमारतीवरील होर्डींग /जाहिरात फलकाची उंची पृष्ठभागापासून ४० फुटापेक्षा (१२.१९२ मी.) जास्त नसेल व त्यातील प्रदर्शित भागाची उंची ३० फुटापर्यंत (९.१४४ मी.) राहील.

४. जमिनीवरील होर्डींग जाहिरात फलकाची उंची पृष्ठभागापासून ४० फुटापेक्षा (१२.१९२ मी.) जास्त नसेल व त्यातील प्रदर्शित भागाची उंची ३० फुटापर्यंत (९.१४४ मी.) राहील.

५. पदपथ नसलेल्या रस्त्यावर कोणतीही जाहिरात प्रदर्शित करता येणार नाही.

६. प्रचलित विकास नियंत्रण नियमावली नुसार खाजगी इमारती /सोसायटी यांचे आवारात तसेच तेथील रहिवाश्यांचे नैसर्गिक मोकळी हवा व प्रकाश मिळण्यास अडथळा निर्माण करणा-या होर्डींगला परवानगी देण्यात येणार नाही.

७. इमारतीच्या गच्चीवरील होर्डींगचा संपुर्ण भाग इमारत रेषेच्या आत असेल.

### बी) कमान-दिशादर्शक फलक(गॅन्ट्री) :-

१. कमान - दिशादर्शक फलक हे तळरस्त्याच्या पातळीपासून किमान २८.५ फुट (८.६८६ मी) उंचीवर असेल. व त्यातील प्रदर्शित भागाची उंची ६.५ फुटापर्यत (१.९८१ मी.)राहील. किंवा स्थानिक भौगोलिक परिस्थिती व इतर बाबी विचारात घेऊन महापालिका त्यामध्ये आवश्यकतेनुसार फेरफार करु शकेल.

२. कमान - दिशादर्शक फलकाचे मुख्य उदिष्ट शहर सौंदर्यीकरण राहील व त्या अंतर्गत शहरातील नागरिकांना सामाजिक सर्वसाधारण ध्वनीविरहीत संदेश (उदा.इलेक्ट्रॉनिक धावते संदेश) देणारे फलक तसेच डिजीटल घड्याळ व तापमानाची माहिती देणारे घड्याळ यांचा समावेश असेल.

३. कमान - दिशादर्शक फलकावरील ५०% प्रदर्शित भाग दिशा/माहिती दर्शवील. उर्वरित विरुध्द बाजुचा प्रदर्शित भाग जाहिरात प्रदर्शनासाठी राहील.

४. कमानी दिशादर्शक फलकाची संरचना व माहिती फलक स्वयंप्रकाशित अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसित, आकर्षक व लक्षवेधी स्वरुपाचा असेल.

५. कमानी उभारण्यापुर्वी दिशा दर्शक फलकाच्या नकाशा चित्रासह कमानीची त्रिभाजिक (Three Dimenstional) प्रतिकृती तयार करुन घेण्यात येईल.

६. कमानी दिशादर्शक फलक उभारताना सदरील वाहतुकीचा रस्ता किंवा पादचारी रस्त्यावरील (पदपथ) होणाऱ्या संभाव्य बदलाचे सविस्तर नकाशा चित्रण सादर करण्यात येईल. तसेच उभारलेल्या कमानीच्या परवानगी कालावधीत महापालिका स्तरावर रस्त्याच्या रुंदीमध्ये बदल झाल्यास उभारलेल्या कमानी/दिशादर्शक फलकाच्या स्थितीत अनुषांगिक बदल घडवून आणण्यात येईल.

**२.अटी व शर्ती :** (शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक प्राधिकरणे/खाजगी, वाणिज्य इत्यादींच्या मालमत्ता/इमारती/जागांवरील जाहिरात फलकाबाबत) :-

१.(अ) शासकीय/निमशासकीय प्राधिकरणे इत्यादींना (उदा.सिडको, एम.आय.डी.सी.,रेल्वे, एम.एस.आर.डी.सी.,सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी) नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील त्यांचे मालकीच्या इमारती/मालमत्ता/ भूखंड/जागा इत्यादींवर वाणिज्य जाहीरात माध्यमे उभारण्याचे हक्क जाहीरात एजन्सी, खाजगी मालक किंवा अन्य कोणासही देता येणार नाहीत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय/निमशासकीय प्राधिकरणांच्या मालकीच्या इमारती, मालमत्ता, भूखंड, जमिन, रस्ते व सार्वजनिक जागा इत्यादींवर वाणिज्य जाहीरात माध्यमांकरीता योग्य जागांची निवड प्रशासकीय तांत्रिक समिती करेल.

प्रशासकीय तांत्रिक समितीने जाहीरात माध्यमे उभारणेकरीता निवड केलेल्या शासकीय/निमशासकीय प्राधिकरणांच्या मालकीच्या इमारती, मालमत्ता, भूखंड, जमिन, रस्ते व सार्वजनिक जागा इत्यादींवर संबंधित प्राधिकरणांना त्याबाबतचे हक्क नवी मुंबई महानगरपालिकेस दयावे लागतील. याबाबत संबंधित शासकीय /निमशासकीय प्राधिकरण व महापालिका यांचेमध्ये करार करण्यात येईल.

सदर इमारतींवर/मालमत्तांवर व भूखंडांवर इत्यादींवर महापालिका स्वत: अथवा अन्य प्रकारे होर्डीग/जाहीरात माध्यमे उभारेल. याकरीता संबंधित प्राधिकरणांची ना हरकत/इमारत/मालमत्तांची स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी, भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी बाबी विचारात घेण्यात येतील.

जाहीरात माध्यमापासून मिळणा-या वार्षिक उत्पन्नामधून जाहीरात माध्यमाच्या देखभाल, दुरुस्ती व प्रशासकीय खर्च वजा करुन शिल्लक उत्पन्नाची रक्कम जागा मालक प्राधिकरण व महापालिका यांचेमध्ये अनुक्रमे २०:८० प्रमाणात विभागणी करण्यात येईल.

**१.(ब)** रहिवाशी व व्यापारी सोसायटया, खाजगी इमारत मालक, खाजगी मालमत्ता धारक यांना त्यांचे मालकीच्या इमारतींवर/मालमत्तांवर वाणिज्य जाहीरात माध्यमे उभारण्याचे हक्क जाहीरात एजन्सी, खाजगी मालक किंवा अन्य कोणासही देता येणार नाहीत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी व व्यापारी सोसायटया इमारती, खाजगी इमारती , खाजगी मालमत्तांवर वाणिज्य जाहीरात माध्यमांकरीता योग्य जागांची निवड प्रशासकीय तांत्रिक समिती करेल.

प्रशासकीय तांत्रिक समितीने जाहीरात माध्यमे उभारणेकरीता निवड केलेल्या रहिवाशी /व्यापारी सोसायटया इमारती, खाजगी इमारती व खाजगी मालमत्तांवर संबंधित रहिवाशी / व्यापारी सोसायटया, खाजगी इमारत मालक, खाजगी मालमत्ताधारक यांना त्याबाबतचे हक्क नवी मुंबई महानगरपालिकेस दयावे लागतील. याबाबत संबंधित रहिवाशी / व्यापारी सोसायटया, खाजगी इमारत मालक, खाजगी मालमत्ताधारक व महापालिका यांचेमध्ये करार करण्यात येईल.

सदर इमारतीवर/ मालमत्तांवर व भूखंडांवर महापालिका स्वत: अथवा अन्य प्रकारे होर्डीग/जाहीरात माध्यमे उभारेल. याकरीता संबंधितांची ना हरकत, इमारत/मालमत्तांची स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी, भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी बाबी विचारात घेण्यात येतील.

संबंधित मालमत्ताधारक व महापालिका यांना जाहीरात माध्यमापासून मिळणा-या वार्षिक उत्पन्नामधून जाहीरात माध्यमाच्या देखभाल, दुरुस्ती व प्रशासकीय खर्च वजा करुन शिल्लक उत्पन्नाची रक्कम अनुक्रमे २०:८० प्रमाणात विभागणी करण्यात येईल.

**सी ) <u>मिनी ॲडपोल</u>**

रस्ता दुभाजकामधील ज्या ठिकाणी विदयुत खांब नाहीत त्या ठिकाणी खांबांदरम्यान स्टीलचा गोल आकाराचा एक प्रकाशित मिनी ॲडपोल जमिनीच्या पृष्ठ भागापासून ०७ फुट (२.१३३ मी.) उंचीवर खालील आकारात उभारता येतील. किंवा स्थानिक भौगोलिक परिस्थिती व इतर बाबी विचारात घेऊन महापालिका त्यामध्ये आवश्यकतेनुसार फेरफार करु शकेल.

१) प्रदर्शित भाग उंची ४ फुट (१.२१९ मी.) x रुंद ३ फुट (०.९१४ मी.)

## डी) युनिॲडपोल

i) जमिनीपासून एकूण ४० फुट (१२.१९२ मी.)उंचीच्या युनिपोल होर्डीगसाठी खालील आकाराचे जाहीरात फलक उभारता येतील.

१) उंची २० फुट (६.०९६ मी.) x रुंद २० फुट (६.०९६ मी.)
२) उंची १५ फुट (४.५७२ मी.) x रुंद ३० फुट (९.१४४ मी.)
स्थानिक भौगोलिक परिस्थिती व इतर बाबी विचारात घेऊन महापालिका फलकाच्या आकारामध्ये शासन नियम-२००३ मधील तरतुदीसापेक्ष आवश्यकतेनुसार फेरफार करु शकेल.

ii) सिमेंट कॉंक्रीटचे फाउंडेशनसह स्टीलखांबाचा व्यास ०३ फुटापेक्षा (०.९१४ मी.) कमी नसेल असा युनिॲडपोल उभारता येईल.

## इ) ट्रायव्हिजन युनिपोल

१. जमिनीपासून एकूण २५ फुट (७.६२५ मी.) उंचीच्या ट्रायव्हिजन युनिपोलसाठी १० फुट (३.०४८ मी.) उंची x २० फुट (६.०९६ मी.) लांबी तसेच १५ फुट (४.५७२मी.) उंची x ३० फुट (९.१४४ मी.) लांबी या आकाराचे जाहिरात फलक उभारता येतील. किंवा स्थानिक भौगोलिक परिस्थिती व इतर बाबी विचारात घेऊन महापालिका त्यामध्ये आवश्यकतेनुसार फेरफार करु शकेल.

२. सिमेंट कॉंक्रीटचे फाउंडेशनसह स्टीलखांबाचा व्यास ०३ फुटापेक्षा (०.९१४ मी.) कमी नसेल असा युनिपोल उभारता येईल.

३. रस्त्याच्या कडेला (रस्त्यावर नाही) ठराविक ठिकाणी जाहिरात माध्यमे उभारता येतील.

## एफ ) किऑस्क

प्रत्येक विदयुत खांब्याच्या मध्यभागी कमाल ०४ फुट (१.२१९ मी.) उंच x २.५ फुट (०.७६२ मी.) रुंद या आकाराचे पाठपोट जाहीरात असलेले प्रकाशित/अप्रकाशित किऑक्स लावता येवू शकतील. प्रत्येक रस्त्याच्या सुरुवातीचा खांब व शेवटचा खांबावरील जाहीरात किऑक्समध्ये नवी मुंबई महानगरपालिका व पोलिस विभागाची हेल्पलाईन क्रमांक ठळकपणे प्रदर्शित करण्यात येईल.

जी) **पादचारी पूल (फुट ओव्हर ब्रिज )**

रस्ता ओलांडताना छोटे-मोठे अपघात टाळणेसाठी, लहान मुले व वयस्कर नागरीक यांचेसाठी वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे व कॅप्सुल लिफ्ट असलेले पादचारी पूल उभारुन त्यावर जाहिरात करता येवू शकेल.

सदर जाहिरातीचा प्रकार स्थिर/दिशादर्शक/इलेक्ट्रॉनिक मिडीया (स्क्रोल जाहिरात) असा असेल. पादचा-यांच्या सोईसाठी पादचारी पुलाच्या संरक्षक कठडयांना जाहीरात फलक लावणेस मनाई राहील. तथापी छतावर आकर्षक जाहीरात प्रसिध्द करता येईल.

एच) **बस स्टॉपलगत मिनी ॲडपोल**

प्रत्येक बस स्टॉपच्या दोन्ही बाजूस एक फुट जाड व्यास असलेले स्टीलपासून बनविलेले दोन्ही बाजूस जाहिरात करता येण्याजोगे प्रकाशित/अप्रकाशित मिनी ॲडपोल लावता येईल. त्याचा आकार खालीलप्रमाणे असेल.

१. पदपथाच्या पृष्ठभागापासून ०८ फुट (२.४३८ मी.) उंचीवर ०६फुट (१.८२८ मी.) उंच x ०४ फुट (१.२१९ मी.) रुंद x १ फुट (०.३०४ मी.) जाडीच्या व्यासाचा मिनी ॲडपोल.

आय) **दिशा दर्शक फलक**

महानगरपालिका क्षेत्रात लावण्यात आलेल्या सर्व दिशादर्शक फलकांच्या मागील बाजूस फ्लेक्स किंवा प्रकाशित स्वरुपात ०६ फुट (१.८२८ मी.) x ०४ फुट (१.२१९ मी.) आकाराची जाहिरात लावता येईल.

## II. (अ) महापालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या जाहीरात माध्यमांपैकी राजकीय/धार्मिक व सामाजिक स्वरुपाच्या तात्पुरत्या जाहीरातींबाबत आरक्षण:-

१. तात्पुरत्या स्वरुपाच्या जाहीरात फ्लेक्स/बॅनर्स अशा प्रकारच्या जाहिराती शहरात मोठया प्रमाणावर प्रदर्शित होत असल्याने शहर सौदर्यीकरणाला बाधा निर्माण होते. याकरीता यापुढे शहरात तात्पुरत्या स्वरुपात फ्लेक्स, बॅनर्स, स्वागत कमानी लावण्यास मनाई राहील.

२. महापालिकेमार्फत स्वत: उभारण्यात येणा-या कायमस्वरुपी जाहीरात होर्डीगपैकी २०% जाहीरात फलक राजकीय,धार्मिक/सामाजिक व आरोग्य संदेश स्वरुपाच्या जाहीराती प्रसिध्दीकरीता आरक्षित राहतील. सदरहू आरक्षण दैनंदिन स्वरुपात राहील. त्याशिवाय नमुंमपाच्या जनजागृती कार्यक्रमासाठी ५ टक्के जाहीरात फलक विनामुल्य आरक्षीत ठेवणे बंधनकारक राहील.

३. धार्मिक,राजकीय, सामाजिक व आरोग्य संदेश स्वरुपाच्या जाहीरातींना वाणिज्य जाहीरातींसाठी निश्चित केलेल्या दरांच्या ५०% इतके शुल्क आकारण्यात येईल.

४. याबाबतचे जाहीरात फी व इतर शुल्क आकारणी व जाहीरात लावणेस परवानगी देण्याचे अधिकार महापालिका आयुक्त किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-यास राहतील.

५. राजकीय ,धार्मिक व सामाजिक इ. प्रकारच्या जाहिरातींना किमान ०१ दिवस व कमाल समारंभ संपेपर्यत परवानगी देण्यात येईल.

६. वाढदिवसाचे शुभेच्छाविषयक संदेश/जाहिरातींना किमान १ दिवस व कमाल ०३ दिवसांपर्यत परवानगी देण्यात येईल.

७. राजकीय, धार्मिक /सामाजिक व आरोग्य संदेश विषयक जाहीरातींसाठी आरक्षित ठेवलेल्या होर्डीगवरील या कामाच्या जाहीरात प्रसिध्दीबाबत दर तीन महिन्यांनी किंवा महानगरपालिकेस सोईस्कर होईल त्याप्रमाणे महापालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांचेमार्फत वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करुन आरक्षणाबाबत अर्ज मागविण्यात येतील.

८. उक्त अ.क्र.७ मधील जाहीरातीनुसार आरक्षण प्राप्त न झाल्यास आरक्षण प्राप्त न झ ाालेल्या कालावधीकरिता जाहिरात फलकावर प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (First Come First Serve) या अटीवर जाहिरात प्रदर्शित करण्याची परवानगी देण्यात येईल.

९. महानगरपालिकेने याकरीता निश्चित केलेल्या दराच्या १०% रक्कम अर्जदाराला अर्ज सादर करतेवेळी आरक्षणासाठी महानगरपालिकेकडे आगाऊ भरणा करावी लागेल.

१०. अर्जदाराने राजकीय/धार्मिक व सामाजिक जाहीरात लावणेपुर्वी ३० दिवस अगोदर उर्वरित ९०% जाहीरात शुल्क भरणा करावे लागेल. अन्यथा त्यांनी अर्जासोबत जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल.

११. राजकीय,धार्मिक,सामाजिक/आरोग्याच्या जाहीरातींच्या आरक्षणामध्ये संबधित पक्ष, संस्था व व्यक्ती यांचे जाहीरात प्रदर्शित करणेच्या कालावधीतील कार्यक्रमांच्या त्या - त्या वेळच्या महत्वानुसार परवानगी देणेबाबत प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल.

१२. निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार राजकीय,धार्मिक व सामाजिक स्वरुपाच्या जाहीरातींना परवानगी देण्यात येईल.

१३. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकणा-या/धार्मिक भावना दुखावणा-या /धार्मिक तेढ निर्माण होईल अशा जाहीराती लावणेस मनाई राहील.

१४. जाहीरात परवानगी देणा-या प्राधिका-यास संबंधित जाहीरात प्रदर्शनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे प्रथमदर्शनी आढळून आल्यास संबंधित मजकुर प्रसिध्दीबाबत कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलिस विभागाकडील ना हरकत पत्र सादर करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

## (ब) शहरामध्ये महापालिकेमार्फत कायमस्वरुपी स्वागत कमानी उभारणे :-

१. शहरामध्ये विविध राजकीय, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांकरिता मान्यवरांचे स्वागतासाठी रस्त्यांवर/पदपथांवर/सार्वजनिक जागांवर खड्डे खोदून तात्पुरत्या स्वरुपात लाकडी/लोखंडी बांबू उभारुन स्वागत कमानी उभारण्यात येतात. यामुळे शहरात ठिकठिकाणी खड्डे खोदल्याने रस्ते/पदपथ नादुरुस्त होतात. त्याचबरोबर शहर सौदर्यीकरणाला बाधा निर्माण होते. याकरीता यापुढे शहरात रस्ते/पदपथ व सार्वजनिक जागांवर तात्पुरत्या स्वरुपात स्वागत कमानी उभारण्यास मनाई राहील.

२. शहरात कायमस्वरुपी आकर्षक स्वागत कमानी उभारणेकरीता तांत्रिक समितीमार्फत योग्य जागांची निश्चिती करण्यात येईल.

३. सदर ठिकाणी महापालिका स्वखर्चाने अथवा अन्य प्रकारच्या माध्यमातून कायमस्वरुपी स्वागत कमानी उभारेल.

४. सदर स्वागत कमानींवर राजकीय, धार्मिक , सामाजिक व आरोग्य संदेश विषयक इत्यादी जाहीरात/माहिती प्रदर्शित करणेकरीता भाग - २ मधील (१)-(II)-(अ) प्रमाणे आरक्षण कार्यपध्दती अंगिकारण्यात येईल.

५. निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार राजकीय,धार्मिक व सामाजिक स्वरुपाच्या जाहीरातींना परवानगी मिळणेबाबत महापालिकेस अर्ज सादर करतेवेळी प्रसिध्द करावयाच्या मजकुराबाबत कायदा, सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलिस विभागाकडील ना हरकतपत्र सादर करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

## ३. जाहीरात माध्यमे व ठिकाणे निश्चित करणेकरीता प्रशासकीय तांत्रीक समिती गठीत करणे :-

विविध जाहीरात माध्यमे उभारणेच्या जागा निश्चित करणेकरिता आयुक्त यांचेमार्फत एक प्रशासकीय तांत्रीक समिती गठीत करण्यात येईल. त्यामध्ये विविध शासकीय/निमशासकीय प्राधिकरणांकडील खालील अधिकारी यांचा समावेश राहील.

| अ.क्र. | समिती पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | आयुक्त,नमुंमपा |
| २ | सदस्य सचिव | विभाग प्रमुख (जाहीरात), नमुंमपा |
| ३ | सदस्य | सहा.संचालक नगररचना, नमुंमपा |
| ४ | सदस्य | शहर अभियंता, नमुंमपा |
| ५ | सदस्य | उप आयुक्त (अतिक्रमण), नमुंमपा |
| ६ | सदस्य | विधी अधिकारी, नमुंमपा |
| ७ | सदस्य | सहा.पोलिस आयुक्त ( वाहतुक), नवी मुंबई |
| ८ | सदस्य | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई |
| ९ | सदस्य | वरिष्ठ नियोजनकार (सिडको) |
| १० | सदस्य | उपजिल्हाधिकारी, ठाणे |
| ११ | सदस्य | कार्यकारी अभियंता(मऔविम) |
| १२ | सदस्य | कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) |
| १३ | सदस्य | कार्य.अभियंता (महा.राज्य रस्ते विकास महामंडळ) |
| १४ | सदस्य | कार्य. अभियंता (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी) |
| १५ | सदस्य | मध्य रेल्वेचे संबंधित अधिकारी |
| १६ | सदस्य | महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे अधिकारी |
| १७ | सदस्य | कार्य.अभियंता, बहुमजली इमारती विभाग, चुनाभट्टी |
| १८ | सदस्य | आयुक्त,नमुंमपा यांनी नामनिर्देशित केलेला नावाजलेला वास्तुरचनाकार |
| १९ | सदस्य | आयुक्त,नमुंमपा यांनी नामनिर्देशित केलेला नावाजलेला शहररचनाकार |
| २० | सदस्य | आयुक्त, नमुंमपा यांनी नामनिर्देशित केलेला नावाजलेला संरचना अभियंता |

वरील समितीमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

महानगरपालिका मालमत्ता, खाजगी मालमत्ता आणि महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्राधिकरणांच्या मालमत्तांवरील जाहीरात माध्यमे उभारणेकरीता योग्य जागांची व सदर जागांवर जाहीरात माध्यमांच्या साईजची निश्चिती उक्त प्रशासकीय तांत्रिक समिती करील.

महापालिका क्षेत्रातील जाहीरात माध्यमांसाठी ठिकाण (स्थळ), होर्डींग साईज, डिझाईन निश्चित करणे आणि जाहीरात माध्यमांकरीता नवीन जागा सुचविणे/जुन्या जागा रद्द करणे बाबत प्रशासकीय तांत्रिक समितीमार्फत आयुक्त यांचेकडे शिफारस करण्यात येईल व त्या अनुषंगाने आयुक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महापालिका सर्वसाधारण सभेकडे सादर करतील.

## ४. (अ) सार्वजनिक ठिकाणी परवानगी देण्यात न येणा-या जाहिराती :

शहर सौदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक जागांवरील खालील तात्पुरत्या जाहिरातींना परवानगी देण्यात येणार नाही.

१.बॅनर/फ्लेक्स बॅनर /लाकडी फ्रेमची फ्लेक्स होर्डींग
२.पोस्टर्स / भित्तीपत्रके/ स्टीकर
३. भिंती रंगवून जाहीरात करणे (वॉलपेंटींग्ज)
४.पाईपलाईनवर रंगविलेल्या जाहिराती.
५.मोठे दगड व उघडे पाषाण.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक जागांवर/ मालमत्तांवर विनापरवानगी तात्पुरते बॅनर्स, पोस्टर्स, कटआऊट, भिंतीवरील रंगविलेली जाहीरात इत्यादी प्रसिध्द करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विद्रुपण नियंत्रण कायदा १९९५ मधील तरतुदीनुसार किंवा कायदयातील इतर तरतुदींनुसार स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येईल. आणि त्यांनी प्रसिध्द केलेल्या जाहीरात प्रकार, साईज, कालावधीनुसार त्या क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या जाहीरात दराच्या रक्कमेच्या ०५ पट दंडात्मक रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. सदर जाहीरात काढणेकरीता महापालिकेला आलेला खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. आणि ज्या व्यक्ती /संस्थेचा त्या जाहीरातीवर फोटो व माहिती प्रसिध्द झालेली आहे. त्यांना लेखी नोटीस देऊन इशारा वजा सूचना देण्यात येईल.

## (ब) खाजगी व स्वत:च्या मालकीच्या जागेत विना परवानगी जाहिरात प्रदर्शनास मज्जाव :

महापालिकेने तयार केलेली जाहिरात मार्गदर्शक धोरण / सुचनांची पायमल्ली करुन कोणत्याही जाहिरातदाराने प्रदर्शित केलेल्या जाहिराती अनाधिकृत समजण्यात येवून त्वरीत काढून टाकण्यात येतील व जाहिरात काढण्यासाठी आलेला खर्च संबंधिताकडून वसूल करण्यात येईल. आणि त्यांनी प्रसिध्द केलेल्या जाहीरात प्रकार, साईज, कालावधीनुसार त्या क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या जाहीरात दराच्या रक्कमेच्या १० पट दंडात्मक रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. तसेच संबंधितांविरुध्द एम.आर.टी.पी व बी.पी.एम.सी ॲक्ट व विहीत कायदयातील तरतुदीनुसार संबंधितांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात येईल.

# III. चलत जाहिरात

## अ. वाहनाव्दारे जाहिरात :

**अटी /शर्ती व निकष :-**

१. प्रादेशिक परिवहन विभागाची परवानगी आवश्यक.

२. वाहनाव्दारे जाहिरात करताना वाहनाच्या चेसीसपासून ०७फुट (२.१३३ मी.) उंची पर्यत १० फुट (३.०४८ मी.) x २० फुट (६.०९६ मी.) आकारात दोन्ही बाजूस प्रकाशित/ अप्रकाशित जाहिरात प्रदर्शित करता येईल. मात्र डिजीटल, एलसीडी डिस्प्ले, चलतचित्र जाहिरात करता येणार नाही.

३. सुस्थितीतील वाहनावर कमाल ०८ वर्षांकरीता जाहिरात करता येईल.

४. रस्त्याच्या कडेला (रस्त्यावर नाही) महापालिकेने निश्चित केलेल्या ठराविक ठिकाणी ठराविक वेळेस वाहनाव्दारे जाहिरात करता येईल.

## ब. वाहनावरील जाहिरात

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात फिरणा-या वाहनांपैकी नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणी झालेल्या दुचाकी, तीनचाकी , चारचाकी, अधिक चाकी ,सर्व प्रवासी वाहतुक बसेस, टॅक्सी आदी वाहनांवर वाणिज्य अथवा अन्य स्वरुपाच्या जाहिरातींकरीता परवानगी घेणे बंधनकारक आहे.

## IV. दुकान, कार्यालय, अन्य वाणिज्य, औद्योगिक व इतर आस्थापना / व्यवस्थापनावरील जाहिराती :-

दुकानदार अथवा व्यावसायीक यांनी त्यांच्या जागेवर प्रदर्शित केलेले ग्लो साईन बॉक्सेस/निऑन साईन्स अशा स्वरुपातील जाहिरात फलकांना खालील अटी व शर्तीनुसार परवानगी देण्यात येईल.

१. दुकानाच्या दर्शनी भागाच्या २०% भागावर प्रसिध्द केलेल्या दुकानाच्या नावाचे फलकास जाहीरात शुल्काची आकारणी करण्यात येणार नाही. त्यापुढील आकाराच्या जाहीरात नामफलकास जाहीरात फी भरणा करुन जाहीरात परवाना घेणे बंधनकारक राहील.

२. वाहतुक चिन्हापासून १० मीटर (३२.८०८ फुट) आडव्या अंतरापर्यत असलेल्या जाहिरात फलकांवरील रंग वाहतुक विभागाच्या प्रकाशित चिन्हांतील लाल, पिवळसर (अंबर) किंवा हिरव्या रंगांप्रमाणे असल्यास परवानगी दिली जाणार नाही.

वाहतुक नियंत्रण दिव्यांच्या उद्देशाला बाधा आणणारे दोन माळयांच्या उंचीपर्यत अथवा पदपथापेक्षा ०६ मीटर (१९.६८४ फुट) उंचीवर असणा-या जाहिरातींना परवानगी दिली जाणार नाही.

३. कोणत्याही व्यक्तीने ज्याच्या प्रकाशाव्दारे आजुबाजुच्या नागरीकांना किंवा आजुबाजुच्या रहिवाशी इमारतींना त्रास होईल असे कुठलेही प्रकाशित चिन्ह उभारु नये. जे प्रकाशित चिन्ह परवानगी नुसार उभारले असतील मात्र सदर प्रकाशित चिन्हाबाबत नागरीक व आसपासच्या इमारतीमधील रहिवाशांनी त्रास होत असल्याची तक्रार केल्यास महानगरपालिका सदर गोष्टींची शहानिशा करुन योग्य निर्णय घेईल.

४. इमारतीमधील रहिवाश्यांना ये-जा करताना अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे जमिनीवर उभे करण्यात आलेल्या चिन्हांना परवानगी दिली जाणार नाही.

५. इमारत रेषेपासून ०३ फुटाहून (०.९१४ मी.)अधिक बाहेर आलेल्या जाहिरातीच्या चौकटींना परवानगी दिली जाणार नाही.

६. दुकान/कार्यालय इत्यादींवरील नामफलकांचे/न्युऑनसाईनचे आकारमान दुकान/कार्यालयावरील उपलब्ध जागेनुसार व शहर सौदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातून दुकानाच्या दर्शनी भागाच्या वरील उपलब्ध असलेल्या जागेच्या टक्केवारीनुसार प्रमाणपध्द आकार आयुक्त अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी निश्चित करेल. याबाबतचे दर महापालिका वेळोवेळी निश्चित करेल. याठिकाणी जाहीरात फलक लावण्यास या उपविधीतील अटी/ शर्तीनुसार जाहीरात परवाना देण्यात येईल.

रस्त्यावरुन दिसणारी इमारतीच्या आवारातील प्रदर्शित दुकान/ कार्यालयांचे नावाची जाहिरात (लॉलीपॉप,पायलॉन वगैरे) तळपृष्टभागपासून किमान ०८ फुट (२.४३८ मी.)उंचीवर असावी. त्यावरील प्रदर्शित भाग ०३ फुट (०.९१४ मी.)उंचीएवढा असावा.

## V. शहर सौंदर्यीकरणांतर्गत जाहिरात :-

अ) महानगरपालिका कार्यक्षेत्रात वाहतुक चौक, बेटे, उदयाने, तलाव, रस्ता दुभाजक, अंडरपास इत्यादींचे सौंदर्यीकरण महापालिका स्वत: करेल अथवा सदर ठिकाणांचे सौदर्यीकरण करणेकरीता प्रायोजित तत्वावर देण्यात येईल.

खालील माध्यमे/सुविधा उभारणे/विकसित करणेकरीता उभयतांमध्ये करार करण्यात येईल. सदर ठिकाणांचे सौदर्यीकरण करणे, देखभाल व दुरुस्ती इत्यादी कामे या संबंधित प्रायोजक संस्थेस स्वखर्चाने करावी लागतील.

महापालिका यापोटी संबंधित प्रायोजक संस्थांना कोणताही मोबदला देणार नाही. करार रद्द करण्याचा अधिकार आयुक्त किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-यास राहील.

वाहतुक चौक, बेटे, उदयाने, तलाव ,रस्ता दुभाजक इत्यादींचे सौंदर्यीकरण करणेबाबत प्रायोजक संस्था निश्चित करण्याचे व त्यांचेशी करार करण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

यापुर्वी शहर सुशोभिकरणासाठी प्रायोजक तत्वावर हॉटेल व्यावसायीक, व्यापारी संस्था, विकसक इत्यादींना देखभाल दुरुस्तीसाठी दिलेली वाहतुक बेटे इत्यादींचे करार सदरहू धोरण अंमलात येईल तेव्हापासून आपोआप रद्द होतील.

**ब)** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून जाणा-या सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) इत्यादींच्या रस्त्यांवरील/उड्डाणपुलाखालील वाहतुक चौक, बेटे, उदयाने, रस्ता दुभाजक इत्यादींचे सौंदर्यीकरणाचे हक्क संबंधित प्राधिकरणांनी महापालिकेस दयावयाचे असून सदर ठिकाणांचे महापालिकेमार्फत सुशोभिकरण करण्यात येईल. त्याठिकाणी महापालिका स्वत: किंवा अन्य माध्यमांतून जाहीरात फलक उभारेल. यापासून महापालिकेला मिळणा-या वार्षिक उत्पन्नामधून सदर ठिकाणचे सुशोभिकरण व देखभाल ,दुरुस्ती इत्यादीसाठी आलेला /येणारा खर्च वजा करुन शिल्लक उत्पन्नापैकी २०% उत्पन्न संबंधित प्राधिकरणास देण्यात येईल.

यापुर्वी संबंधित प्राधिकरणांनी शहर सुशोभिकरणासाठी महापालिका क्षेत्रातून जाणा-या रस्त्यांवरील वरील कामाकरीता नियुक्त केलेल्या /ठेका दिलेल्या व्यक्ती/संस्थाशी केलेले करार रद्द करावे लागतील.

**१. पोलिस किऑक्सः-** वाहतुक पोलिस यांना उभे राहणेसाठी वर्तुळाकार, षटकोन किंवा अष्टकोन या आकाराचे १० फुट (३.०४८ मी.)उंचीचे पोलिस किऑक्स उभारता येईल.

**२. फोन किऑक्सः-** महापालिका कार्यक्षेत्रातील बस स्थानकांमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी फोन किऑक्स उभारुन त्यामध्ये एल.सी.डी./ इलेक्ट्रॉनिक जाहिरात करता येईल.

**३. कॉबलर किऑक्सः-** महापालिका कार्यक्षेत्रातील बस स्थानक/ रेल्वे स्थानकांजवळ नागरिकांच्या सोयीसाठी पादत्राणे दुरुस्तीकरीता कॉबलर किऑक्स उभारुन त्यावर दोन बाजुंस स्वयंप्रकाशित जाहिरात करता येईल. कॉबलर किऑक्स ०२ फुट (०.६०९ मी.) उंचीच्या चौथ-यावर ४ फुट (१.२१९ मी.) x ४ फुट (१.२१९ मी.) आकाराचा ०६ फुट (१.८२८ मी.)उंचीचा उभारता येईल.

**४. फ्लॉवर पॉट किऑक्सः-** महापालिका कार्यक्षेत्रातील वाहतुक बेट, चौक या ठिकाणच्या विदयुत खांब्यांवर साधारण किऑक्स परवानगी न देता फ्लॉवर पॉट किऑक्स परवानगी देण्यात येईल. तळपष्टापासून ०७ फुट (२.१३३मी.) उंचीवर ०२ फुट (०.६०९ मी.) x २ फुट (०.६०९ मी.) आकाराचा फ्लॉवर पॉट किऑक्स उभारता येईल.

**५. पार्कींग पोल**:- वाहतुक शाखेचे सांकेतिक चिन्हदर्शक फलकांच्या मागील बाजूस १.५ फुट (०.४५७ मी.) x १.५ फुट (०.४५७ मी.) गोल/आयत किंवा इतर आकाराच्या प्रकाशित जाहिरातीसाठी उभारता येईल.

**६. रस्ता दुभाजकावरील जाहिरातः-**महापालिका कार्यक्षेत्रातील रस्ता दुभाजकांमध्ये विविध रंगी फुलझाडे लावून त्यामध्ये ०३ फुट (०.९१४ मी.) उंची x ०२ फुट (०.६०९ मी.) लांबीच्या लॉलीपॉपमध्ये ०१ फुट (०.३०४ मी.) x १.५ फुट (०.४५७ मी.) डिस्प्ले होणारे इलेक्ट्रॉनिक घडयाळ रस्त्याच्या सुरुवातीच्या ठिकाणी राहील.

**७. स्ट्रीट फर्निचर जाहिरातः-** पदपथावरील ग्रील,डस्टबीन, बेंचेस, ०१ किंवा एकापेक्षा जास्त सीटच्या मुतारीवर जाहिरात लावणे.

२०/-

**८. वाहतुक सिग्नलवरील संदेश फलक :-** शहरातील रस्त्यांवरील सिग्नलवर वाहतुकीचे व इतर सामाजिक स्वरुपाचे संदेश देणारे LCD/LED स्क्रोल इत्यादी फलक उभारणे. व त्यामागील बाजूस वाणिज्य स्वरुपाची जाहीरात फलक प्रसिध्द करणे.

**९. निशान / झेंडा लावणेसाठीचे कायमस्वरुपी स्टँड :-** शहरातील रुंद असलेल्या रस्तादुभाजकांमध्ये निशान/झेंडा लावणेसाठी दुभाजकामध्ये खोलवर रोवलेले कायमस्वरुपी निशान/झेंडा स्टँड उभारण्यात येईल. सदर स्टँडवर उघडझ‌ाप होणारे झाकण बसविण्यात येईल. इतर सार्वजनिक ठिकाणी निशान/ झेंडा उभारण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**१०.अंडरपासमधील सुशोभिकरणांतर्गत जाहीरात:-** शहरातील अंडरपासमध्ये सुशोभिकरण करुन त्यामध्ये सुशोभित जाहीरातींचा अंतर्भाव करण्यात येईल.

*भाग -०३*

## अे) जाहिरात परवानगीचे सर्वसाधारण नियम :-

सक्षम प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय शहरात कोणत्याही संस्थेस (एजन्सी) दुकाने , शोरुम्स, कार्यालय, पेट्रोलपंप, सिनेमागृह, मॉल्स इत्यादी व्यावसायिक ठिकाणी जाहिरात फलक, निऑन साईन,बलून इत्यादी व्दारा जाहिरात फलक प्रदर्शित करता येणार नाहीत. जाहीरात फलक लावणेस परवानगी देण्यासाठीचे मार्गदर्शक निकष हया भागात सविस्तरपणे देण्यात आले आहे.

उपरोक्त बाबींचे शुल्क/दरांचे कॅटलॉग /बुकलेट स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल. महापालिकेने तयार केलेली जाहिरात मार्गदर्शक धोरण/सुचनांची पायमल्ली करुन कोणत्याही जाहिरातदाराने प्रदर्शित केलेल्या जाहिराती अनाधिकृत समजण्यात येवून त्वरीत काढून टाकण्यात येतील व जाहिरात काढण्यासाठी आलेला खर्च संबंधिताकडून वसूल करण्यात येईल. आणि त्यांनी प्रसिध्द केलेल्या जाहीरात प्रकार, साईज, कालावधीनुसार दंडात्मक रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात येईल.

## १. (i) जाहिरात फलकाचे आकारमान :-

रस्त्याच्या वर्गवारीनुसार शहर सौंदर्यीकरणाचा विचार करुन निम्नदर्शित आकाराचे होर्डीग फलक महानगरपालिकेच्या, शासकीय,निमशासकीय प्राधिकरणांच्या व खाजगी जागांवर उभारता येतील.

१. ४० फुट (१२.१९२ मी.) x २० फुट (६.०९६ मी.)

२. ३० फुट (९.१४४ मी.)x २० फुट (६.०९६ मी.)

३. ३० फुट (९.१४४ मी.)x १५ फुट (४.५७२ मी.)

४. ४० फुट (१२.१९२ मी.)x १० फुट (३.०४८ मी.)

५. २० फुट (६.०९६ मी.)x २० फुट (६.०९६ मी.)

६. २० फुट (६.०९६ मी.)x १० फुट (३.०४८ मी.)

तथापी आवश्यकतेनुसार यामध्ये शहराची भौगोलिक स्थिती, शहराचे सौदर्यीकरण, जाहीरात माध्यम उभारण्याच्या ठिकाणी उपलब्ध होणारी जागा व कायदेशीर बाबी विचारात घेऊन होर्डीग फलकाच्या आकारमानात शासनाने निश्चित केलेल्या होर्डीग आकारमानासापेक्ष आयुक्तांच्या अधिकारकक्षेत आवश्यकतेनुसार बदल करता येतील.

१. इमारतीच्या संरचनात्मक स्थिरतेच्या अधीनतेने, इमारतीच्या टोकावर ६० फूट (१८.२८८ मी.) x २० फूट (६.०९६ मी.) (कमाल) या प्रमाणेतर आकाराचे जाहिरात फलक लावण्यास परवानगी देण्याचा अपवाद वगळता कमाल प्रमाणे आकाराहून अधिक आकाराच्या जाहिरात फलक उभारता येणार नाहीत.

(ii) लगतच्या रस्त्याची सर्वसाधारण प्रमाणशीर सरासरी रुंदी विचारात घेऊन सक्षम प्राधिकरणाच्या निर्णयानुसार एकेरी मार्गांवरील जाहिरात फलकांचे आकारमान समान ठेवण्यात येईल. जाहिरात फलक ठरविलेल्या अनुज्ञेय आकारमानात चौकटीच्या पध्दतीने असतील.

(iii) रस्त्यांची वर्गवारीनुसार जाहीरात माध्यमांचे ठिकाण, प्रकार, आकार व डिझाईन एकसमान निश्चित करण्यात येईल.

सदर फलकांचे दैनंदिन, साप्ताहीक,मासिक, वार्षिक व सिझन/हंगामानुसार कमी जास्त होणारे पायाभुत भाडे निश्चित करण्यात येईल.

याकरीता कॅटलॉग/ बुक्लेट तयार करण्यात येईल. त्यामध्ये होर्डीगचा प्रकार, साईज, ठिकाण व त्याचे सिझन/हंगामानुसार बदलत जाणारे दैनंदिन, साप्ताहीक, मासिक व वार्षिक पायाभुत भाडे व जाहीरात शुल्क याचा समावेश करण्यात येईल.

"नवी मुंबई महानगरपालिका जाहीरात व आकाशचिन्ह उपविधी - २०११" ची अंमलबजावणी करताना जाहीरात प्रसिध्दीबाबत परवानगीचे अधिकार आयुक्तांकडे ठेवणे किंवा आयुक्तांच्या परवानगीने बाहय जाहीरात एजन्सींना देणेबाबत प्रशासकीय व अर्थिक दृष्टया फायदेशीर कार्यप्रणाली ठरविण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

(iv) सँडविच (पाठोपाठ) पध्दतीच्या आणि व्ही आकाराचे, प्रमाणित आकारमानाचे जाहीरात फलक उभारता येतील.

(v) जाहिरात फलकाला आधार देणारी संरचनात्मक चौकट फलकाच्या प्रमाणित आकारमानाशी तुलना करता फलकाच्या दोन्ही बाजूस मान्य केलेल्या १५ से.मी. पेक्षा अधिक मोठी असणार नाही. जमिनीच्या पृष्ठभागापासून उभारलेला स्तंभ सोडून जाहिरात फलकाच्या उभ्या आकारमानाच्या वर अधिक आकारमान असणार नाही. संरचनात्मक चौकटीची केलेली वाढ ही जाहिरात फलकाच्या आकारमानात केलेली वाढ असे समजण्यात येईल आणि ती सदरहू धोरणातील निकष आणि अटी व शर्तींचा भंग करणारी ठरेल.

हया मार्गदर्शक तत्वांच्या अगोदर परवानगी देण्यात आलेले विद्यमान जाहिरात फलक धोरण मंजूर होईपर्यंत लावता येतील. त्यानंतर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी इमारती/मालमत्ता/जमिन/भूखंडांवरील आणि शासकीय/ निमशासकीय प्राधिकरणांनी त्यांचे इमारती/मालमत्ता/भूखंड/रस्ते दुभाजक इत्यादींवर लावलेली/उभारलेली जाहीरात होर्डींग/जाहीरात माध्यमे संबंधितांस स्वत:हून काढून घ्यावी लागतील. अन्यथा सदर जाहीरात होर्डींग/जाहीरात माध्यमे महापालिकेमार्फत हटविण्यात येतील व त्यापोटी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल.

(vii) १) पदपथापासून ७ फूट (२.१३३मी.) उंचीवरील एका खांबावरिल १.२ मीटर्स (३.९३७फुट) xमीटर्स (५.९०५ फुट)आकारमानाचे बॅकलिट (पाठोपाठ)फलक महानगरपालिकेला आवश्यकता भासेल तेव्हा कोणत्याही क्षेत्राकरिता निविदा मागवून महानगरपालिकेच्या १० फूटापेक्षा (३.०४८ मीटर) अधिक रुंदी असलेल्या निवडक मार्गाच्या पदपथांवर व किमान ५० मीटर्स (१६४.०४ फुट) अंतरावर उभारता येतील.

२) पदपथापासून कमाल १० फूट (३.०४८ मीटर) उंचीवरील, एका खांबावरील १.४ मीटर्स (४.५९३ फुट) x ३.०० मीटर्स (९.८४२ फुट)आकारमानाचे ट्रायव्हीजन (किंवा ट्राय - ॲड किंवा थ्री साईडेड) बॅकलिट फलक महानगरपालिकेला आवश्यकता भासेल तेव्हा निविदा मागवून महानगरपालिकेच्या १५ फूटांपेक्षा (४.५७२ मीटर) अधिक रुंदी असलेल्या निवडक मार्गांच्या पदपथांवर व किमान १०० मीटर्सच्या (३२८.०८ फुट) अंतरावर उभारता येतील. तथापि १० फूटांपेक्षा (३.०४८ मीटर) कमी रुंदी असलेल्या पदपथांवर ट्रायव्हीजन किंवा बॅकलिट जाहिरात फलक उभारता येणार नाहीत.

(viii) एन.एम.एम.टी.च्या बसथांब्यांवर, आश्रयस्थानांच्या मागील बाजूस १.२ मीटर्स (३.९३७ फुट) x १.८ मीटर्स (५.९०५ फुट)आकारमानाच्या बॅकलिट जाहिरात फलक उभारता येतील.

## २. <u>जाहिरात फलकाचे सरंचनात्मक चित्र / उभारणी</u>

जाहिरात फलकाचे संरचनात्मक चित्र/उभारणी हे सौंदर्यपूर्ण आणि शासन किंवा महानगरपालिकेच्या परवानाधारक संरचनात्मक अभियंत्याने मंजूर केलेल्या बांधकाम आराखडयानुसारच राहील, सदर जाहिरात फलक सौंदर्यपूर्वक दिसण्यासाठी त्याच्या चारही बाजूस असलेल्या योग्य त्या चौकटीचाही जाहिरात आकारामध्ये समावेश असेल. संरचनात्मक चौकट ही प्रामुख्याने एका खांबावर किंवा जास्तीत जास्त दोन खांबापेक्षा अधिक खांबांवर आधारलेली नसेल परंतु कोणत्याही परिस्थितीत दोन खांबांपेक्षा अधिक खांबांवर आधारलेली नसेल. सर्व खांब आणि जाहिरात फलकाची मागील बाजू सुबकतेने आच्छादिलेली असेल. सर्व जाहिरात फलकांचे बांधकाम त्यांच्या आधारासह आणि सदर जाहिरात फलकांची मागील बाजू वर्षातून किमान दोनदा गडद हिरव्या इनमॅल रंगाने रंगविण्यात येईल.

जाहिरात फलकांच्या अर्जांमध्ये बाहय प्रकाश योजनेच्या मांडणीसह संगणकीकृत संकल्पचित्राचा समावेश असेल.

## ३. इमारतीची संरचनात्मक स्थैर्यता

(अ) एखादया इमारतीची संरचनात्मक स्थैर्यतेच्या दृष्टीकोनातून तपासणी केल्यानंतर आणि शासनाकडील परवानाप्राप्त बांधकाम अभियंत्याने दिलेले तसे संरचनात्मक स्थैर्यता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच इमारतीवर जाहिरात फलक उभारणेबाबत महानगरपालिका निर्णय घेईल.

(ब) दर तीन वर्षांनी संरचनात्मक अभियंत्याचे जाहिरात फलक बांधकामाचे संरचनात्मक स्थैर्यता प्रमाणपत्र आणि इमारतीच्या संरचनात्मक स्थैर्याबाबतचे प्रमाणपत्र तपासून जाहीरात होर्डींग/ माध्यमाबाबत निर्णय घेण्यात येईल.

## ४. जाहिरातीचे अनुज्ञेय रंग

जाहिरात फलकांकरिता वापरण्यात येणारे रंग वाहतुक नियंत्रण दिव्यांच्या लाल, पिवळा आणि हिरव्या चिन्हांच्या व फलकांच्या रंगांशी मिळतेजुळते नसावेत आणि कोणतेही वाहतूक नियंत्रक दिवे स्पष्ट दिसण्यात अडथळा होईल अशा त-हेने सुध्दा जाहिरात फलक लावण्यात येणार नाहीत.

## ५. जाहिरात फलकाची जमिनीपासूनची मोकळी जागा

(अ) जाहिरात फलकाचा खालील तळ जमीनीपासून ३ मीटर्स (९.८४२फूट) पेक्षा कमी असणार नाही.

(ब) कोणत्याही परिस्थितीत पदपथावर जाहिरात फलक प्रक्षेपित करण्यात येणार नाही

(क) ज्या ठिकाणी पदपथ नाही अशा सार्वजनिक मार्गावर जाहिरात फलक प्रक्षेपित करण्यात येणार नाही.

## ६. जाहिरात फलकाची जास्तीत जास्त उंची

(अ) जेव्हा जमिनीवर उभारण्यात येईल तेव्हा अधिकतम उंची म्हणजेच जाहिरात फलकाच्या वरील भागापर्यंतची उंची भूपृष्ठाच्या पातळीपासून फलकाचा तळ अंतर्भूत करुन ४० फूटांपेक्षा (१२.१९२ मी.) अधिक नसेल. तथापि, ४० फूटांपेक्षा (१२.१९२ मी.) अधिक उंची असलेल्या उड्डाणपूलांशेजारी अपवादात्मक बाबींमध्ये उंचीबाबत १० फूटाची (३.०४८ मीटर) मुभा राहिल.

२५/-

(ब) इमारतीच्या गच्चीवर जाहिरात फलक उभारताना जाहिरात फलकाची अधिकतम उंची गच्चीच्या पातळीपासूनची मोकळी जागा अंतर्भूत करुन १२.२ मीटर्स (४१.०१ फूट ) पेक्षा अधिक नसेल. सदर उंची भारतीय आंतरराष्ट्रिय विमानतळ प्राधिकरण (आयएएआय) त्यांच्या विमान उड्डाणाच्या व उतरण्याच्या क्षेत्रात घातलेल्या उंचीच्या मर्यादेसापेक्ष राहील.

(क) एकावर एक जाहिरात फलक उभारण्यात येणार नाहीत.

७. **दोन जाहिरात फलकांमधील किमान अंतर**

(अ) रस्त्याच्या / विहितरेषेच्या एकाच बाजूच्या खांबावरील दोन जाहिरात फलकांमधील अंतर तेथील भौगोलिक परिस्थिती, उपलब्ध जागा, शासनाने माध्यमांचे निश्चित करुन दिलेले आकारमान व कायदेशीर बाजु इत्यादी तपासून प्रशासकीय समिती निश्चित करेल.

**(ब)** व्ही आकाराच्या आणि सॅण्डविच (पाठोपाठ) जाहिरात फलकांच्या बाबतीत किमान अंतराचा आणि क्षेत्राचा नियम लागू होणार नाही.

८. **जाहिरात फलकांची विहित रेषा**

(अ) शक्यतो ठराविक विभागातील विशेषत: राष्ट्रीय महामार्ग , पामबीच व "अ" दर्जाच्या मार्गालगतच्या जाहिरात फलकांच्या आकारमानाची एकसमानता आणि विहित रेषा राखण्यात येईल. याबाबत प्रशासकीय समिती जागांची व जाहीरात माध्यमांचे आकारमानाची निश्चिती करेल.

(ब) पूलावरील जाहिरात फलकांच्या बाबतीत, फलकांच्या बांधकामाच्या आधाराची उंची पूलाच्या भिंतीच्या उंचीपेक्षा अधिक होणार नाही व एकसमान रेषेत येईल अशा पध्दतीने जुळविण्यात येईल.

९. **जाहिरात फलकांचे एकत्रिकरण**

जाहिरात फलकांचे एकत्रिकरण करता येणार नाही.

१०. **जाहिरात फलकांचे प्रक्षेपण**

(अ) जनतेच्या सुरक्षिततेचा विचार करता, बांधकामाच्या/इमारतीच्या गच्चीवरील जाहिरात फलकाचे बांधकाम इमारत रेषेच्या बाहेर प्रक्षेपित करता येणार नाही.

(ब) जर पदपथ नसेल तर मोकळ्या जागेवरील जाहिरात फलक रस्ता रेषेच्या वाहन मार्गावर प्रक्षेपित करता येणार नाही.

(क) मोकळ्या जागेवरील जाहिरात फलक पदपथावर प्रक्षेपित करता येणार नाही.

## ११. रेल्वेच्या परिसरातील जाहिरात फलक

कोणत्याही रस्त्यावरुन दर्शनीय असणा-या जाहिरातींव्यतिरिक्त रेल्वे जागेत असलेल्या स्थानकांवरील किंवा तेथील भिंतीवरील रेल्वेच्या व्यवसायाशी निगडीत असलेल्या जाहिरातींना महापालिका अधिनियम १९४९ च्या कलम २४५ अंतर्गत असलेल्या तरतूदींनुसार महापालिकेचा परवाना घेणे बंधनकारक नसेल.

तथापी, रेल्वेच्या जागेत किंवा रेल्वे स्थानकांमध्ये उभारावयाच्या जाहिराती आणि खालील वर्गवारीत मोडणा-या जाहिराती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील २४४ व २४५मधील तरतुदींनुसार नियमन करण्यास बांधील आहेत.

(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रेल्वेव्दारा/सिडकोव्दारा रेल्वे परिसरात, स्थानकावर, रेल्वे जमिनीवर इत्यादी ठिकाणी कोणत्याही रस्त्यावरुन दर्शनिय किंवा रस्ता सन्मुख प्रदर्शित होणारे जाहीरात फलक / जाहीरात माध्यमे उभारणेचे हक्क यापुढे रेल्वे / सिडको महामंडळास खाजगी एजन्सीस देता येणार नाहीत. याबाबत या मार्गदर्शक धोरणामधील भाग-०२ मधील अ.क्र. ०२ वरील अटी/ शर्तीनुसार संबंधित प्राधिकरणांस कार्यवाही करावी लागेल.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रेल्वे, सिडको, नमुंमपा व इतर प्राधिकरणांच्या जागांवर यापुर्वी परवानगी दिलेल्या होर्डीग्ज ही मार्गदर्शक धोरण अंमलात येताच काढून घेणेची जबाबदारी संबंधित प्राधिकरणांवर राहील.

## १२. बंधने / मर्यादा

(अ) वाहन चालकाच्या दृष्टीक्षेपात येणा-या प्रकाशित जाहिरात फलकास वाहतूक पोलिस खात्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात येईल.

(ब) भूपृष्ठपातळीवर उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकाच्या सन्मुख प्रत्येक छेदनमार्गाच्या विराम रेषेपासून (स्टॉप लाईनपासून) २५ मीटर्स (८२.०२० फुट) अंतरापर्यंत कोणताही जाहिरात फलक उभारण्यात येणार नाही.

(क) वाहतूक बेटे आणि सिग्नल नाक्यांभोवती जाहिरात फलकउभारण्यात येणार नाही.

(ड) ज्यामुळे लगतच्या भागातील समुद्र, हिरवळ, रमणीय भूप्रदेश किंवा मोठया आकाराचे वृक्ष दृष्टीस झाकले जातील, अशा प्रकारे जाहीरात फलक उभारण्यात येणार नाहीत. समुद्र किनारे, वाहनतळ किंवा रस्त्याच्या समुद्राकडील समुद्रकिना-यालगतच्या कोणत्याही जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यात येणार नाहीत.

(इ) कोणत्याही इमारतीच्या उजेड किंवा वायुवीजनास अडथळा निर्माण करणा-या ठिकाणी जाहिरात फलक उभारण्यात येणार नाही.

(फ) महत्वाच्या पुरातन, वास्तुशास्त्रीय,सौंदर्यपूर्ण किंवा ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतींवर जाहिरात फलक उभारण्यात येणार नाही.

(ग) प्रकाशित / निऑन साईन जाहिरात फलकांबाबत खालील बंधने राहतील :-

(१) प्रकाशाची पातळी स्त्रोत मर्यादेच्या १ सीडी / चौ.से.मी. पेक्षा अधिक नसावी. रोषणाई/प्रकाशव्यवस्था रात्रौ १२.०० वा. नंतर चालू ठेवण्यात येऊ नये.

(२) निवासी भागातील निऑन साईन उघडझाप करणारी नसावीत. निवासी विभागात / परिसरात निऑन साईन जाहिरात फलकांना परवानगी देण्यात येणार नाही.

(३) व्हिडीओ किंवा डिजिटल चलित जाहिराती लावण्यात येणार नाहीत. एल.ई.डी. जाहिराती इ. हया फक्त अचल असतील. फक्त कमीत कमी १० सेकंदानंतर होणा-या चित्रातील बदल अनुज्ञेय असेल.

(ह) एका भूभागावर एकापेक्षा अधिक जाहिरात फलक लावण्याच्या बाबतीत खाजगी जागेवर भूभागाच्या एकूण क्षेत्राच्या किमान ४०० चौ.मी. क्षेत्रापर्यंत एकापेक्षा अधिक जाहिरात फलक उभारता येणार नाहीत. दुसरा जाहिरात फलक उभारणेकरीता किमान दुसरे कमीत कमी ४०० चौ.मी. आकाराचे क्षेत्र असणे आवश्यक आहे. तथापी जाहीरात माध्यमे उभारणेकरीता योग्य जागांची निवड करणेचा अथवा भौगोलिक परिस्थिती व शहर सौदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातून दोन जाहीरात फलकांमधील अंतर कमी जास्त करण्याचा अधिकार प्रशासकीय तांत्रीक समितीस राहील.

(जे) एका इमारतीच्या गच्चीच्या किमान ४०० चौ.मी. क्षेत्रापर्यंत एकापेक्षा अधिक फलक उभारता येणार नाही. तथापि, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ठरावाबरोबर अगदी वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकाची संमति असणे बंधनकारक राहील. तथापी जाहीरात माध्यमे उभारणेकरीता योग्य जागांची निवड करणेचा अथवा भौगोलिक परिस्थिती व शहर सौदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातून दोन जाहीरात फलकांमधील अंतर कमी जास्त करण्याचा अधिकार प्रशासकीय तांत्रीक समितीस राहील.

(के) ध्वनी व वायू प्रदुषण होते या कारणास्तव जाहिरात फलक प्रकाशमान करण्यासाठी , डिझेल जनरेटर संच वापरता येणार नाही.

२८/-

## III. महापालिकेच्या मालमत्तेवरील जाहिरात फलक

(अ) १. सर्व विद्यमान जाहिरात फलक हे धोरण मंजूर झालेनंतर धोरणाशी सुसंगत नसल्यास काढण्यात येतील.

२. पादचारी, वाहतूक व सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येणार नाही याची खात्री करण्यासाठी व सौंदर्य अबाधित राखण्यासाठी पदपथ व रस्त्यांवर जाहिरात फलक प्रक्षेपित करता येणार नाहीत.

(ब) महापालिकेच्या मालमत्तांवर हया धोरणामध्ये नमूद केलेल्या आकारमानाच्या मर्यादेत राहून त्या आकाराचे होर्डीग्ज उभारता येतील.

## बी. तरंगत्या फुग्यांवर करावयाच्या जाहिरातीबाबत विशेष नियम / तत्वे

तरंगत्या फुग्यांव्दारा प्रकाशित किंवा अप्रकाशित जाहिरातीसाठी खाली नमूद केलेल्या शर्तीची पूर्तता करण्यासापेक्ष परवानगी देता येईल :-

(अ) जाहीरातदार फूगा अशा त-हेने प्रदर्शित करेल की, ज्याव्दारा तो इतर प्रदर्शित जाहिरातीसाठी हस्तक्षेप करणार नाही किंवा अडथळा आणणार नाही.

(ब) फुग्यांव्दारा प्रदर्शित केलेल्या जाहिरातीच्या दरम्यान जाहीरातदार कोणत्याही आणीबाणीच्या काळात फुग्यांची पाहणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करील.

(क) जाहीरातदार भारत सरकारच्या नागरी हवाई खात्यामार्फत प्राप्त झालेले ना-हरकत प्रमाणपत्र सादर करील आणि त्यांच्या सर्व नियम व नियमावलीचे पालन करील.

(ड) सदर फुगा ठेवण्यामुळे किंवा त्याकरिता वापरण्यात येणारा पदार्थ गॅस_किंवा इतर वापरलेले यंत्र किंवा वादळात फुगा पडण्याच्या कारणांमुळे किंवा सदोष बांधकाम, निष्काळजीपणा , अपघात किंवा इतर अशी अन्य कारणे ज्यामुळे कोणत्याही मालमत्तेस किंवा व्यक्तीस कोणताही अपघात किंवा दुखापत झ‍ाल्यास जाहीरातदार भरपाई करण्यास जबाबदार असेल.

सी. **<u>व्यावसायिक जागांवर जाहिराती प्रदर्शित करण्याबाबत विशेष निकष/ तत्वे :-</u>**

_व्यावसायिक जागांवरील प्रकाशित, ग्लो साईन बॉक्सेस् आणि प्रकाशित/निऑन साईन नामफलक हयासारख्या जाहिरातींना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २४४ व २४५ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार परवानगी देण्यात येईल/ नियमित करण्यात येईल. व्यावसायिक जागांवरील प्रकाशित , ग्लो - साईन बॉक्सेस् आणि प्रकाशित / निऑन साईन नामफलक हयावर जाहिराती प्रदर्शित करण्यासाठीची परवानगी खालील नमूद केलेल्या अटी आणि 'साईन्स आणि आऊटडोअर डिस्प्ले ऑफ नॅशलन बिल्डिंग कोड'भाग -१०, ची पुर्तता करण्यासापेक्ष जाहिरात प्रदर्शित करण्यास परवानगी देण्यात येईल.

अ) कोणत्याही प्रकाशित वाहतुक चिन्हांच्या (ट्रॅफिक सिग्नल) १० मीटर्सच्या (३२.८०८३ फुट) आडव्या अंतरावर, लाल, पिवळसर किंवा हिरव्या रंगाची प्रकाशित चिन्हे (जाहिराती) उभारली किंवा ठेवली जाऊ नये. पांढ-या प्रकाशाव्यतिरिक्त इतर प्रकाशाने प्रकाशित केलेली दोन मजल्यांपेक्षा कमी उंचीची किंवा पदपथापासून ६ मीटर (१९.६८५० फुट) उंच हयापैकी जी अधिक उंचीची असेल अशी सर्व जाहिरात विषयक चिन्हे अशारितीने प्रदर्शित करण्यात यावी की, इतर कोणत्याही चिन्हांमध्ये किंवा वाहतुक नियंत्रणाच्या सिग्नलमध्ये मिसळणार नाहीत.

ब) कोणीही व्यक्ति, लगतच्या किंवा जवळपासच्या निवासी इमारतीतील रहिवाशांना त्रासदायक ठरेल अशाप्रकारचे प्रखर प्रकाशाचे नामफलक चिन्ह उभारणार नाही. नामफलक उभारणीस परवानगी दिल्यानंतर उभारलेले कोणतेही चिन्ह प्राधिका-याच्या दृष्टीकोनातून, अशाप्रकारचा प्रखर प्रकाश लगतच्या अथवा जवळपासच्या इमारतीतील रहिवाशांना त्रासदायक ठरणारा असल्यास, प्राधिका-याच्या आदेशान्वये, संबंधित जाहिरात नामफलक लावणा-या मालकाने, प्राधिका-यने नमूद केलेल्या वाजवी वेळेत काढून टाकावा अथवा त्यात योग्य तो बदल करावा.

क) प्राधिका-याच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक सुविधा, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या हितार्थ आवश्यक विद्युत चिन्हांशिवाय इतर विद्युत चिन्हे रात्रौ १२.०० वा. नंतर चालू ठेवता येणार नाही.

ड) कोणत्याही इमारतीच्या आत व बाहेर जाण्याच्या मार्गावर अडथळा निर्माण करु शकतील अशी जमीन चिन्हे लावू नयेत.

इ) प्रक्षेपित चिन्ह किंवा त्याच्या आधाराचा कोणताही भाग किंवा चौकट इमारतीच्या पलिकडे प्रक्षेपित होणार नसावीत. तसेच, ती रस्ता सन्मुख भूखंडाच्या रेषेच्या पलिकडे प्रक्षेपित होणारी नसावीत.

फ) व्यापारी जागेत तेथे विक्री होणा-या वस्तूंची अथवा तेथे पुरविण्यात येणा-या सेवा इत्यादी बाबतची जाहिरात करण्याचीच फक्त परवानगी देण्यात येईल.

## डी. ज्याकरिता परवानगीची आवश्यकता लागत नाही अशा जाहिराती

प्रकाशित जाहिराती आणि आकाशचिन्हे (स्कायसाईन) वगळता खालील प्रकारच्या जाहिरातींना महानगरपालिकेची परवानगी घेण्याची गरज नाही :-

(अ) खिडकीत प्रदर्शित केलेली जाहिरात,

(ब) रेल्वेच्या कामकाजाशी संबंधित आणि रेल्वेच्या जागेत प्रदर्शित केलेली परंतु रस्त्यावरुन दर्शनीय नसलेली जाहिरात.

(क) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४५ नुसार वगळलेल्या जाहीराती.

## १३. नकारात्मक जाहिरातींवर प्रतिबंध :-

खालील नकारात्मक जाहिराती प्रसिध्द करण्यास मनाई राहील.

(i) नग्नता दर्शविणा-या जाहिराती.
(ii) वर्णभेद, जाती भेद दर्शविणा-या जाहिराती.
(iii) दारु,सिगारेट,तंबाखू, व अंमली पदार्थांचा प्रचार करणा-या जाहिराती.
(iv) अयोग्य लाभासाठी , स्वार्थासाठी महिला व मुले यांच्या शोषण दर्शविणा-या किंवा शोषणास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणा-या जाहिराती.
(v) लैंगिकता दर्शविणा-या जाहिराती.
(vi) प्राण्यांवर क्रुरता दर्शविणा-या जाहिराती.
(vii) एखादी संस्था किंवा राष्ट्राच्या विरुध्द आक्षेपार्ह जाहिराती.
(viii) एखादी व्यक्ती किंवा ब्रँड बाबत आक्षेपार्ह जाहिराती.
(ix) भारतीय जाहिरात परिषदेने किंवा कायदयाने प्रतिबंधित केलेल्या जाहिराती.
(x) हिंस्सेचे उदात्तीकरण करणा-या जाहिराती.
(xi) विस्फोटक किंवा नाशके दर्शविणा-या जाहिराती.
(xii) नियमबाहय बेकायदेशीर लॉटरी, जुगार,मटका, इत्यादींशी संबंधित जाहिराती.
(xiii) शस्त्रास्त्रे किंवा त्या संबंधी वस्तु दर्शविणा-या जाहिराती.
(xiv) बदनामीकारक किंवा बेकायदेशीररित्या त्रस्त करण्याच्या उद्देशाने तयार केलेल्या जाहिराती.

(xv) ज्या जाहिरातींमध्ये बिभत्सता, लैंगिक व्यभिचार किंवा कामौत्तेजक दृश्ये किंवा महिलांच्या बाबतीत अवमानकारक उल्लेख दर्शविला आहे की (ज्यामध्ये महिलांचे अप्रस्तुत प्रतिनिधित्व प्रतिबंध कायदा १९८६ मधील बाबींचा समावेश होतो.)

(xvi) अशा जाहिराती ज्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अशा दर किंवा सेवांशी संबंध येतो, ज्या प्रचलित कायदयाने प्रतिबंधीत आहे(औषधे आणि सौंदर्य प्रसाधन कायदा १९४०, औषधे किंवा जादूने उपाययोजना प्रतिबंधक जाहिराती कायदा १९५४, भारतीय दंड विधान १८६०)

(xvii) महापालिकेला अयोग्य वाटलेल्या इतर जाहिराती.

(xviii) धार्मिक भावना दुखावणा-या जाहिराती.

३२/-

## १. <u>जाहिरात शुल्क, छाननी शुल्क, अनामत रक्कम, विलंब शुल्क, दंडात्मक शुल्क व जाहीरात माध्यमांच्या मानांकनाचे बुकलेट/कॅटलॉग</u> तयार करणे:-

i) जाहीरात शुल्क, छाननी शुल्क, अनामत रक्कम, विलंब शुल्क, दंडात्मक शुल्क, जाहीरात माध्यमांचे दर, भुईभाडे, सणवार/हंगामानुसार दैनिक साप्ताहीक, मासिक व वार्षिक शुल्क निश्चित करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका जाहीरात सल्लागाराची नियुक्ती करेल.

ii) जाहीरात परवाना नुतनीकरणास विलंब झाल्यास कालावधीच्या प्रमाणात परवाना शुल्काच्या टक्केवारीनुसार विलंब शुल्क आकारण्यात येईल.

iii) विनापरवानगी जाहीरात माध्यमासाठी आकारावयाचे दंडात्मक शुल्क ४ (अ),(ब) प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

iv) जाहीरात परवाना कालावधी हा ०३ वर्षांसाठी असल्यामुळे वर्षाच्या सुरुवातीला बाजार दरांचा अभ्यास करुन किमान शुल्क निश्चित करण्यात येईल.

v) किमान दर निश्चित केल्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास १०% शुल्क वाढविण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.

vi) जाहीरात सल्लागारामार्फत जाहीरातीचे ठिकाण, माध्यम, त्याचा प्रकार, क्षेत्रफळ व त्यासाठी वर नमुद केलेले शुल्क इत्यादींचा समावेश असलेले स्वतंत्र कॅटलॉग/बुकलेट तयार करण्यात येईल.

vii) जाहीरात सल्लागाराने वरील बाबी समाविष्ट करुन तयार केलेले कॅटलॉग/बुकलेट आयुक्त मंजूरीस्तव महापालिका सर्वसाधारण सभेत सादर करतील.

## २.<u>महापालिका मालकीच्या जागांवर/इमारतीवर जाहीरात माध्यमे उभारणे -</u>

महापालिका मालकीच्या इमारती/मालमत्ता/जागा इत्यादींवर जाहीरात होर्डीग /जाहीरात माध्यमे उभारणेबाबत प्रथम जागा, जाहिरात माध्यमे व माध्यमाची साईज प्रशासकीय तांत्रिक समितीमार्फत निश्चित करण्यात येईल. त्यास महापालिका सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यात येईल.

जाहीरात होर्डीग/कमानी इत्यादी जाहीरात माध्यमे महापालिका स्वत: उभारेल किंवा अन्य प्रकारे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी विचारात घेऊन आयुक्त निविदा काढून सार्वजनिक यशस्वी निविदाकाराकडून करुन घेतील.

## ३. कायमस्वरुपी जाहिरात होर्डींग, ग्लोसाईन, न्युऑन, फुगे इत्यादी करीता आवश्यक असलेले कागदपत्र

अ) **इमारतींवरील होर्डींग :**

१. इमारत मालकाचे किंवा गृहनिर्माण संस्थेचे इमारतीवर महापालिकेमार्फत होर्डींग उभारणेस हरकत नसलेबाबतचे प्रमाणपत्र.

२. इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र

३. इमारत मालककिंवा गृहनिर्माण संस्था यांनी रुपये १००/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर महापालिकेशी केलेला करारनामा.

४. गृहनिर्माण संस्था असल्यास, सदर संस्थेच्या लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेली, सदर संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत रीतसर मंजूर केलेल्या ठरावाची प्रत.

५. इमारतीच्या गच्चीवरील जाहिरात फलकाच्या बाबतीत अगदी वरच्या मजल्यावरील धारक / धारकांचे ना - हरकत प्रमाणपत्र.

६. ज्या जागेवर जाहिरात प्रदर्शित करावयाची आहे ती जागा सार्वजनिक प्राधिकरणाने म्हणजेच, महानगरपालिका, राज्य सरकार, बंदरे विश्वस्त, म्हाडा,मेरीटाईम बोर्ड, एम.आर.डी.ए., इत्यादींनी भाडेपट्टयाने दिली असल्यास, सदर जागा भाडयाने देणा-याचे ना- हरकत प्रमाणपत्र.

ब) **भूखंडावरील होर्डींग :**

जमिन मालकीचे दस्तावेज (७/१२ उतारा, भाडेपट्टा, करारनामा इ.) जमिन मालकाशी केलेल्या करारनाम्यात याबाबतच्या परवानगीची नोंद असल्याची प्रत.

**आणि**

**इतर कागदपत्रे :**

१. की (Key) प्लॅन नकाशाच्या १:२५०० Scale च्या दोन प्रती आणि ब्लॉक प्लॅन नकाशाच्या १: २५० Scale च्या दोन प्रती.

२. बाहय प्रकाश योजनेच्या मांडणीसह संगणकीकृत संकल्पचित्राच्या प्रतिमेचा समावेश असलेल्या रचना, रंगयोजना आणि संदर्भित नियोजित जागेचे निश्चित स्थान दर्शविणा-या नकाशाच्या दोन प्रती.

३. डिझाईन व रंगसंगतीसह होर्डीगची प्रस्तावित जागा दर्शविणा-या नकाशाच्या दोन प्रती.

४. प्रस्तावित होर्डीग्जच्या जागेचे किमान ६० मीटर (१९६.८५० फुट ) अंतरावरुन काढलेले १० x ८ इंच आकाराचे छायाचित्र .

५. प्रस्तावित होर्डीगच्या सभोवताली २५ मी.(८२.०२० फुट) अंतरावर असणारे वृक्ष व इतर होर्डीग दर्शविणा-या नकाशांच्या दोन प्रती.

३४/-

६. पोलिस वाहतुक शाखेचा ना हरकत दाखला.

७. आवश्यक त्या ठिकाणी नागरी उड्डयन विभाग, भारत सरकार यांचे विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र

८. नोंदणीकृत संरचना अभियंता यांनी प्रमाणित केलेले होर्डीगचे स्ट्रक्चरल डिझाईन व संरचना स्थैर्यता प्रमाणपत्र.

९. ज्या इमारतीवर होर्डीग उभारणेचे प्रस्तावित आहे, त्या इमारतीचा परवानाधारक संरचनात्मक अभियंत्याने दिलेला संरचना स्थैर्यता प्रमाणपत्र.

१०. जागा मालक-भाडेपट्टेदार/गृहनिर्माण संस्था यांनी स्वाक्षरी केलेली रुपये १००/- मुद्रांक शुल्क पेपरवर खालील बाबी नमुद केलेले नोटरी केलेले जॉइंट इंडीमिनिटी बॉन्ड.

अ) शेजारच्या इमारतीची खेळती हवा , प्रकाश याला प्रदर्शित केलेल्या जाहिरातीमुळे अडथळा होत नाही.

ब) प्रदर्शित केलेल्या जाहिरातीमुळे ति-हाईत व्यक्तीने दावा सादर केल्यास महानगरपालिकेस येणा-या सर्व खर्चाची नुकसान भरपाई देणेबाबत.

११. सक्षम प्राधिका-यास वरील कागदपत्रांव्यतिरिक्त भविष्यात वेळोवेळी आवश्यक वाटतील अशी कागदपत्र सादर करणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

**क)** **विमा:-** जाहिरात होर्डीग, ग्लोसाईन, न्युऑन, फुगे इत्यादीमुळे किंवा जाहीरात उपकरणांमुळे होणा-या संभाव्य नुकसानीचा विमा काढणे संबंधितांवर बंधनकारक राहील. या विम्यामध्ये कोणत्याही व्यक्तीचा अपघाती मृत्यु झाल्यास, अपंगत्व आले, मालमत्तेचे नुकसान झाले तर त्या व्यक्तींना किंवा त्या मालमत्ताधारकास भरपाई देण्याची तरतुद असणे बंधनकारक राहील.

## ४. दुकाने/व्यापारी संकुलांवर प्रकाशित ग्लोसाईन, निऑन साईन इत्यादी जाहिरात नामफलक लावणेकरीता आवश्यक असणारे कागदपत्र :

**अ. जागेचा पुरावा :**

जागा मालकीबाबतची कागदपत्र,मालमत्ता कर देयकाची प्रत, किंवा जागा भाडयाची असल्यास भाडेपट्टा करारनाम्याची प्रत व जागा मालकाचा ना हरकत दाखला.

**ब.** गृहनिर्माण संस्था असल्यास संस्थेचा ना हरकत प्रमाणपत्र

**क.** जाहिरात फलकाचे मोजमाप दर्शविणारे स्केच व जाहिरातीचा मजकुर.

**ड.** जाहिरात प्रदर्शित करावयाच्या जागेचे नुकतेच काढलेले ४X६ इंच आकाराचे छायाचित्र.

## ५. जाहिरात फलकांकरिता जाहिरात परवाना कालावधी व शुल्क

(अ) जाहीरात परवान्याचा कालावधी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४४ नुसार राहील व नुतनीकरण अर्थिक वर्षानुसार करण्यात येईल.

(ब) जाहीरात परवाना मुदत संपुष्टात येण्यापूर्वी ०१ महिना अगोदर पुढील संपूर्ण वर्षाकरिताचे शुल्क आगाऊ भरणे बंधनकारक राहील.

## ६. महापालिका क्षेत्रामध्ये जाहिरात प्रदर्शित करताना पालन करावयाचे सर्वसाधारण नियमः

१. प्रदर्शित केलेली जाहिरात ही सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेनेच प्रदर्शित होईल.

२. जाहिरात मसुदा संबंधीत प्राधिकरणाने मंजूर केलेला असेल.

३. जाहिरातीद्वारे कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुहाची कुप्रसिद्धी करण्याचा हेतू नसेल.

४. जाहिरातीद्वारे कोणत्याही उत्पादका विषयी अनादर भावना किंवा उत्पादनास कमी लेखण्याचा प्रयत्न नसेल.

५. जाहिरातीमध्ये कोणत्याही अन्य जाहिरातदार अथवा उत्पादनाच्या नावात प्रतिकात्मक /अन्य प्रकारचे साधर्म्य नसेल.

६. जाहिरातीमध्ये अन्य उत्पादन / उत्पादनाच्या ट्रेडमार्क विषयी नक्कल नसेल.

७. जाहिरातीमध्ये कोणत्याही विशिष्ट धर्माच्या / जातीच्या किंवा समुहाच्या भावना दुखावल्या जातील अशा प्रकारचे प्रसिद्धी मजकूर नसेल.

८. परवानाधारकाने बांधकाम आणि जाहिरात फलक सौंदर्यपूर्ण संकल्पित केलेले आहे, आखलेल्या चौकटीत आहे. तसेच, सर्वकाळ योग्यरित्या परिरक्षित केले आहे याची खात्री केली पाहिजे. तसेच, जाहिरात फलकांची मांडणी आणि मागची बाजू गडद हिरव्या इनॅमल रंगाने रंगविलेली असेल.

९. परवानाधारकाने , मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम २४४ व २४५ या तरतुदींशी विसंगत, अश्लिल किंवा भडक स्वरुपाची किंवा कोणताही गुन्हेगारी स्वरुपाचा संदेश प्रदर्शित करणारी जाहिरात प्रदर्शित करणार नाही.

१०. महापालिका क्षेत्रातील प्रत्येक जाहीरात होर्डीगला चढत्या क्रमाने ठळकपणे दिसेल असा अनुक्रमांक देण्यात येईल.

११. जाहीरात होर्डीग/फलकावर महानगरपालिकेच्या दप्तरी असलेल्या अभिलेखामध्ये नमूद केल्यानुसार, परवानगीच्या माहीतीचा तपशिल फलकाच्या खालील उजव्या कोप-यात प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

१२) अ)जाहिरात फलकाच्या प्रत्येक बाजुला २५ मी. (८२.०२० फुट) अंतरातील अस्तित्वात असलेले वृक्ष राखणे,जतन व संरक्षण करण्याची एकमेव जबाबदारी जाहीरात फलक लावणा-याची/उभारणा-यांची राहील. या अटीची पुर्तता होण्यासाठी अशी संस्था व्याजमुक्त अनामत रक्कम रु.२५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र)प्रत्येक वृक्षासाठी जमानत ठेव म्हणून ठेवील.

३६/-

ब) फांदया तोडणे, झाडे कापणे, छाटणी आणि/किंवा काटछाट करणे या गुन्हयांकरिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत करण्यात येणा-या कोणत्याही दंडनीय कारवाई करण्याबरोबर, महानगरपालिका रु.१०,०००/- पेक्षा अधिक नाही इतकी अंशत: किंवा संपूर्ण अनामत रक्कम जप्त करेल.

१३. धुम्रपान,मद्य,अंमली इ. पदार्थांच्या सेवनाचा प्रचार करणाऱ्या जाहिरातींना परवानगी नसेल.

जाहिरात प्रदर्शनासंदर्भात जाहिरातदार व महापालिकेमध्ये कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास याप्रकरणी अंतिम निर्णय घेण्याचे सर्वाधिकार आयुक्त यांचेकडे राहतील.

महापालिकेचे मुंबई प्रांतिक महानगरपालकि अधिनियम १९४९ मधील कलम २४४ व २४५ नुसार जाहीरात व आकाशचिन्ह उपविधी निश्चित झालेनंतर महाराष्ट्र शासनाने जाहीरात व आकाशचिन्ह धोरणात काही बदल केल्यास शासनाचे धोरणात नमुद असलेल्या परंतु महापालिकेच्या उपविधीत नमुद नसलेल्या परंतु महानगरपालिकेस फायदेशीर असलेल्या बाबी विहीत पध्दतीने महापालिका उपविधीत समाविष्ट करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

## ७. निर्वाचनाच्या शक्ती :-

या उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ लावण्यासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास अशा ठिकाणी आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

## ८. लवादः-

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात जाहीरातदाराला दिलेल्या परवानगीबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्याबाबत अंतिम अधिकार आयुक्त किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिका-यास असेल. आयुक्त यांनी नेमलेला प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय हा अंतिम असेल आणि तो सर्व संबंधितांवर बंधनकारक असेल.

आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त इतर कोणाही व्यक्तीला लवाद म्हणून काम पाहता येणार नाही. लवादाकडे अर्ज करण्यासाठी जाहीरात परवानगीची मुदत संपल्यानंतर ९० दिवसांच्या आंत अर्ज करावा लागेल. हा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही प्रकारचा अर्ज स्विकारला जाणार नाही. व कोणत्याही प्रकारची भरपाई देय नाही किंवा कोणताही वाद नाही असे मानले जाईल.

## ८. निरसन :-

हे उपविधी अस्तित्वात येण्याचे दिनांकास नवी मुंबई महानगरपालिकेने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये होर्डींगबाबत समाविष्ट केलेल्या तरतुदी आणि याविषयी यापुर्वी मंजूर केलेले उपविधी, नियम,ठराव निरसित होतील.

स्वाक्षरीत/-

**आयुक्त**

**नवी मुंबई महानगरपालिका**

# (परिशिष्ट “अ” )

## नमुना अ

**नवी मुंबई महानगरपालिका**

**परवाना विभाग**

अर्जाचा नमुना

**भाग एक**

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ पहा)

प्रति,

-------------------------

नवी मुंबई महानगरपालिका

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे (पुर्ण) नाव | : | |
| २ | वाणिज्य आस्थापना, दुकान , कार्यालय , औद्योगिक कारखाने इत्यादीचे नाव | | |
| ३ | निवासी पत्ता (पुर्ण) व संपर्क दुरध्वनी क्रमांक | : | |
| ४ | जाहीरात फलक लावण्याचे स्थान (ठिकाण) | : | |
| ५ | स्तंभ ३ मध्ये दर्शविलेल्या जागेवर केलेल्या व्यवसायाचा तपशिल | : | |
| ६ | जाहिर नामफलकाचे स्वरुप - प्रकाशित / अप्रकाशित | : | |
| ७ | जाहिरात नामफलकाचे मोजमाप (फुटामध्ये) | : | |
| ८ | जमिनीच्या तळपृष्ठापासून जाहीरात नामफलकाच्या तळाची उंची (फुटामध्ये ) | : | |
| ९ | संरचनेचा तपशिल | : | |
| १० | अर्ज वैयक्तिकरित्या केला किंवा संस्था / कंपनीच्या वतीने केला आहे किंवा कसे तसे असल्यास पुर्ण पत्त्यासह कंपनीचा/संस्थेचा / व्यक्तीचा तपशिल. | : | |

३८/-

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | ज्या दुकानावर/कार्यालयावर फलक उभारावयाचा आहे.ती अर्जदाराच्या मालकीची आहे किंवा कसे पुराव्या-सहीत मालमत्तेचा तपशिल दयावा. | : | |
| १२ | दुकान/कार्यालय अर्जदारा व्यतिरिक्त दुस-या व्यक्तीच्या मालकीची असेल तर जमीन मालकाचे नाव व टपालाचा पत्ता. | : | |
| १३ | जमिन मालकाने जाहीरात नामफलक उभारण्याची संमती दिलेली आहे किंवा कसे तसे असेल तर कृपया मुळ संमती पत्र जोडावे. | : | |
| १४ | जाहीरात नामफलकाचे ठिकाण मोकळ्या जागा आहे कि लोक वस्तीचे क्षेत्र आहे. | : | |
| १५ | ज्या तारखेपासून जाहिरात नामफलक उभारावयाचा आहे ती तारीख | : | |
| १६ | जाहिरातीचा कालावधी. | : | |

**शपथपत्र**

मी, ------------------------------------------राहणारा--------------------------------

गांभीर्यपुर्वक प्रतिज्ञा करतो की, वरील माहीती खरी आणि अचूक आहे.

दिनांक - अर्जदाराची स्वाक्षरी व शिक्का